# VIDAGDHA-STRI-CHARITRA

## A NOVEL.

COMPOSFD BY

CHINTAMAN DIXIT JOSI.

REGISTERED UNDER ACT XX. OF 1847,

*AND*

ACT XXV. OF 1867.

SATARA,

Printed at the

"Bodha-Sudhakara" Press

1871.

*Date Gunesh Printer*

# विदग्धस्त्रीचरित्र.

हें

पुस्तक

## चिंतामण दीक्षित जोशी

यांनीं कल्पिलें

तें

सातारा

"बोधसुधाकर" छापखान्यांत छापिलें.

(सन १८४७ चा अक्ट २० व १८६७ चा आक्ट
२५ प्रमाणें रजिष्टर केलें आहे.)

शके १७९३ प्रजापतिनामसंवत्सरे.

इसवी सन १८७१.

# प्रस्तावना.

आर्या.

देवें पयोधरानीं झांकावें अंबरा असी अढ-
ळ ॥ वस्तु स्थिति केली परि, ती उलटिति
म्हणुन कामिनी प्रबळ ॥ १ ॥
झांकूनि अंबरानें, पयोधरां कामुकांस दुर्दि-
न या ॥ करिती अघटित घटना, सामर्थ्यें
विनावितां करोत दया ॥ २ ॥

अघटितघटनासामर्थ्य, चतुरमनुष्यांत किती अ-सतें, हें ध्यानांत येण्यासाठीं आबालवृध्धांस समजेल अशा सुलभ भाषेनें मी हें विदग्धस्त्रीचरित्र लिहितों.

या वसंतकालिकानामकस्त्रीनें आपल्या पतीस कसें फसविलें; आपले व आपल्या उपपतीचे मनोरथ पूर्ण कसे कले व इतकें करूनहि पतीनें आपली द्रव्य हानि मनांत न आणितां बायकोनें आपल्यास मोठ्या संकटांतून पार केलें असें समजून तिचे अतिशय आभार मानून तिजवर पहिल्यापेक्षां अधिक प्रीति केली या सर्व प्रकरणासाठीं,

तिनें तर्कानें इंद्रजाळ कसें उत्पन्न केलें याजकडे पाहिलें असतां बुद्धि म्हणून जी ईश्वराची देणगी आहे, तिला मोल नाहीं, असा जो ग्रंथांनीं सिद्धांत केला आहे तो खरा, असा निश्चय होतो. असा ती अमोल देणगी असून जो कोणी [illegible] त्याकडे खर्ची किंवा आपल्या क्षणिक सुखाकडे खर्ची याचा विचार केला तर क्षणिक सुखाकडे खर्चणें उचित नाहीं असें साफ ठरतें. तरी मनुष्य आपल्या उच्च नीच स्वभावाप्रमाणें त्या देणगीचा विनियोग करितात. कोणास चांगलें समजतें तरी आपल्या स्वभावापुढें त्यांचा उपाय चालत नाहीं तथापि या वसंतकलिकेप्रमाणें जे आपल्या क्षणिक सुखाकडे उत्तम बुद्धि खर्चितात त्यांनीं कल्पवृक्षाचा लाभ झाला असतां त्याला खणून सर्पण केलें असें होतें, म्हणून तें दुर्दैव असें जाणावें, "दैव देतें पण कर्म नेतें" असी म्हण आहे, ती असा प्रसंगावरूनच——

आर्या

कामादिकांस जे वश, ते होती पापदुष्पथीं
धीट ॥ हें गुज वसंतकलिकाचरितीं
आहे पुढें पहा नीट ॥ २ ॥

फार विचारानें खर्चण्याची वस्तू जी बुध्दी, तिच्यांत किती करामत आहे हें समजण्यासाठीं एक ग्रन्थ लिहून

रसिक विद्वान यांस नदर करावा असा मनोरथ झाला; म्हणून या विदग्धचरित्रास आरंभ करितो. विदग्ध (चतुर)

या ग्रन्थाचा उद्देश ज्याची तर्कशक्ति उत्तम पण स्वभाव दुष्ट ते लोक कपट वेषांतुन करून विश्वासघात कसा करितात तें दाखवावें असा आहे, स्त्री जातीच दुष्ट असें प्रतिपादन करावें, असा नाहीं. केवळ विवक्षितार्थ मनांत भरण्यासाठींच एका स्त्रीचें चरित्र लिहिलें आहे. वस्तुतः पाहिलें तर, स्वभाव चांगले किंवा वाईट याचें माप स्त्रीजातींत व पुरुषजातींत सारखें आहे;जसे पुरुषांत तशा स्त्रियांतहि किती एक जगास वंद्य व किती एक जगास निंद्य झाल्या व आहेत—या करितां एथें स्त्री जातीच तात्पर्य विषय आहे, असें नाहीं. तात्पर्यविषय, स्वार्थतत्पर दुष्टस्वभाव अशांपासून अनर्थ कसा होतो तो दाखवावा, हाच आहे. ही मागील कलमांतील आर्येची व्याख्या होय.

ग्रन्थकर्ता.

# विदग्धस्त्रीचरित्र.

भूलोकीं, उत्तम शहर जें विजयपूर, तेथें दोन तरुण होते; एकाचें नांव वसन्तगुच्छ आणि दुसऱ्याचें प्रवालशेखर. ते गुरूजवळ विद्याभ्यास करून उत्तम प्रतीचे हुशार झाले. नंतर त्यांस असें वाटलें कीं, आपण कांहीं दिवस देशाटन करावें. कारण देशाटन केल्याशिवाय, जगांतील चमत्कार, रमणीय देश, पर्वत, नद्या, सरोवरें, उत्तम मनुष्यें, पशु, पक्षि, यांच्या दर्शनानें व समागमानें जो आनंद, तो दुर्लभ आहे. असें त्यांच्या मनांत ठसल्यावरून ते प्रवासास निघाले. त्यांला रूप, वय आणि विद्या, या तीनहि गुणांची उत्कृष्ट अनुकूलता होती, ह्मणून, ते जेथें जात तेथील पुरुष, बायका, विद्वान, अविद्वान, बाल, वृद्ध, या सर्वांस प्रिय होत; त्यामुळें अपरिचितस्थळींहि कोठें त्यांस दुःख झालें नाहीं. असे समाधानानें, ते प्रवास करित असतां, कांहीं देशांतील चमत्कार पहून विघ्नभंजन नामक नगरांत येऊन तेथें बरेच दिवस राहिले, त्यायोगानें तेथील राजकीय लोकांशींहि त्यांचा स्नेह बहूत झाला, राजकीय लोकांस त्यांचे गुण पसंत झाल्यावरून, त्यांनीं त्यांस ह्मटलें कीं,

तुमची रोजगार करण्याची इच्छा असेल, तर आह्मीं फार आदरानें तुह्मांस चांगल्या पदवीच्या जगा दरबारांत योजिल्या आहेत. तें ऐकून **प्रवालशेखर** यास थोडा धनलोभ होता, म्हणोन दरबारांत अधिकार, हें मोठें भूषण आहे असें समजून, तो तेथें कामगार झाला.

**वसंतगुछानें**, बंदांत राहून सुखाची आशा करणें हें याचें अज्ञान आहे, परंतु यास या समयीं बोध करीन तर तो ठसणार नाहीं; कारण त्याची मति या वेळेस गुंगली आहे, अनुभवाअंतीं यास कळून येईल आणि लवकरच आपण या पेचांतून निघेल; असें त्याच्या हिताचें काम त्यावरच सोंपवून आपण तेथून निघाला.

पुढें कांहीं काळानें तो **प्रवालशेखर** हे राजसेवेस विटून कांहीं द्रव्य मिळविलें होतें तें घेऊन, देशाटन करण्यास निघाला. त्यास वाटलें कीं, माझा मित्र **वसंतगुछ** मजपेक्षां हुशार खरा, मी उगीच धनाला भुलून मित्रवियोगाचें दुःख मात्र भोगिलें. असा मनांत खिन्न होऊन तो त्या मित्रासाठीं वेडा झाला; मग ठिकाणोठिकाणीं त्या आपल्या प्रिय मित्राचा शोध करीत असे; असेंअसतां एका दिवशीं दैवयोगानें अकस्मात् चंद्रभागानदीच्या तीरीं स्नानसमयीं त्याउभयतांची गाठ पडली, तेव्हां चार वर्षांनीं उभयतांची परस्पराशीं भेट झाली ह्मणून, त्याबालमित्रांस जो आनंद झाला तो ब्रह्मांडांत माईना. मगस्नान संध्या भोजन करितात इतक्यांत ऐन दोन प्रहरची-

वेळ आली. ह्मणून जवळच एक उत्तम सरोवर, ज्याभोंवतीं दाटअंबराई होती, त्याच्या तीरीं त्या आंबराईंत जाऊन बसले आणि आनंदानें प्रवासांतील आपापले अनुभव ऐकमेकांस सांगूं लागले.

**वसंतगुच्छ.**— गड्या प्रवालशेखरा, तूं राजसेवा केलीस तींत तुला अतिशय सुख झालें असेल, नाहीं बरें? सुख कितीं झालें असेल, हें, तुझ्या शरीराची टवटवी नाहींशी झाली, तें कोमेजलें आहे व त्याला मंदत्व आलें, मुखचर्या अप्रसन्न व त्रस्त झाली आहे, कंठस्वर कर्कश निघतो, त्यांत पहिली मधुरता कांहींच राहिली नाहीं तर ही राजसेवकांचीं चिन्हें तुजवर पक्कीं उमटलीं यावरून मी समजतच आहे.

मी त्यावेळेस तुला आपला अभिप्राय सांगून त्या व्याघ्रीच्या मुखांतून सोडवावें असें योजीत होतों; परंतु माझ्या मनांत आलें कीं, हा दैवयोगानें धनलोभाच्या पाशांत सांपडला आहे, आतां माझें बोलणें व्यर्थ होईल, आणि ( मित्र आपल्या वियोगाच्या दुःखाकडे पाहून मला असें म्हणतो, तें न ऐकिल्यामुळें मी निष्ठुर जनांत प्रथम आहे, ) असें तुझ्या मनास खाईल ह्मणोन, कांहींच बोललों नाहीं. तुझ्या हुशारीवरून मला पूर्ण भरंवसा होता कीं, तूं लौकरच विटून आपोआप या संकटांतून निघशील. आनंद झाला. आज राहुमुक्त चंद्राप्रमाणें तुझें दर्शन झालें. आजचें दिन सुदिन आहे.

मी जर तेव्हां तुझ्या सारखा गुंतलों असतों, तर आपल्या जन्माच्या सार्थकतेला मुकलों असतों. आतां एक. तुझ्या वियोगाचें दुःख चार दिवस भोगावें लागलें; परंतु काय सांगूं. तें जन्माचें साफल्य व ते ते अनुभव सांगण्यास ईश्वरानें शब्द उत्पन्न केलेच नाहींत, अथवा केलेच नाहींत कशास ह्मणावें? ईश्वराला ते उत्पन्न करवणारच नाहींत.

प्रवालशेखर.— बरें बरें. तर ऐकूंदेगड्या कायतें. अनुभवविशेष सांगण्यास शब्द नाहींत खरें परंतु कांहीं दिक्प्रदर्शन तर कर, मग त्यावरून जें सांगतां येत नाहीं, त्याचें अनुमान करतां येईल. कारण सुख, दुःख, यांचें अधिक उणें त्या त्या कारणांनीं झालेले अनुभव ह्मणून सर्वांस, आहेतच; यास्तव तुझ्या सुखाची जात तर कळेल.

एक मात्र आश्चर्य आहे कीं, प्रवासांत दुःखाचें नांव न घेतां सुखच सांगतोस. प्रवासी जो जो आढळतो तो तो आपल्या दुःखाचेंच गाऱ्हाणें सांगतो. ठीकच प्रवासांत दुःख नाहीं असें होईल कसें? त्यांत सुखाचा अंश येतो, परंतु आला तरी तो थोडा असतो, असें असून तुला प्रवासांत दुःख नाहीं; हें कसें खरें मानावें?

वसंतगुछ—ही गोष्ट खरी (अथवा जरा मनुष्याणां) हें खोटें नाहीं; परंतु, त्यांत व्यवस्था आहे. जे पराधी

नतेनें फिरणारे ह्मणजे चाकर किंवा धनलोभी, याचक किंवा यात्रेकरी, ते असे कीं अमुक यात्रा करून लौकर घरीं गेलें पाहिजे, नाहीं तर, मागें कोणी जिंदगी गडप करील अशा काळजीचे, अशा प्रकारच्या लोकांस मात्र प्रवास दुःखदायक आहे. जे स्वछंदानें फिरणारे, ज्यांस मागली काळजी नाहीं, पाहिजे तेथें पाहिजे तितके दिवस राहाणारे, पाहिजे त्या दिशेस जाणारे, अशांस प्रवासांत कांहीं दुःख नाहीं, उलटा तो त्यास पुष्टिकारक होतो. आतां कदाचित् अकस्मात् पर्जन्यानें भिजविलें, किंवा रात्रीं राहाण्यास जागा चांगली मिळाली नाहीं, उन्हाळा फार झाला, तर दुःख होतें खरें; परंतु तें अगदीं अल्प आहे, तें पराधीनतेच्या अवस्थेसारिखें अनिवार नाहीं. पाहा बरें; सूर्य उन्हानें व्याकुळ करूं लागतो, तेव्हां तो ताप कितीं दुःसह वाटतो, परंतु छत्री किंवा फार झालें तर झाड, यांचा आश्रय केला कीं तो नाहींसा होतो, ह्मणून; बाह्य ताप देणारा सूर्य तो काय? तो अगदीं दुर्बळ आहे. दुर्दैवानें गरजवंत होऊन दुसऱ्याकडे जाणें, आणि त्याचें गर्विष्ठ, वक्र असें मुख पाहणें, यांपासून जो ताप होतो तो हिंवाळ्यांत बर्फांत बुडून राहिलें, तरी जाणार नाहीं. त्याचें जेव्हां जेव्हां स्मरण होतें तेव्हां तो नवाच! असा असतो. तर मला कदाचित् ऊन पाऊस इत्यादिकांपासून दुःख झालें; परंतु त्याचें आतां स्मरण देखील होत नाहीं.

**प्रवाल०** —बरें, राहूंदे आतां तुझें पाल्हाळी बोलणें, तूं मला एका शब्दानें, कांहीं एक तुझी गोष्ट ऐकण्याची अति उत्कंठा केली आहेस, तर चित्रध्वजनगरांत मी राहिलों आणि तू तेथून निघालास, त्या दिवसापासून आपले जातीचे चमत्कारिक अनुभव काय असतील, ते सांग.

**वसंतगुछ**—पाल्हाळी बोलण्यास कंटाळूं नये, एकादे वेळेस त्यांतूनच कांहीं चमत्कार निघतो आणि आपल्यास कांहीं सिद्धांत करितां येतो. बरें, असो, आतां ऐक. मी तेथून निघालों, तो जलमार्गानें थेट रामेश्वरास गेलों, मग तिकडील देश, लोक, रीति, हवा, हीं मला बरींशीं वाटेनात ह्मणोन, तेथून लौकरच निघालों; तों **अनंतशयन, कुंभकोण, श्रीरंगपट्टन, वेंकटगिरी.** हीं उत्तम स्थानें पाहावीं ह्मणोन, त्या मार्गानें आलों. कांहीं गोसावी व कांहीं आपल्या जातीचे ब्राह्मण, असे मला सोबती होते. तुझ्यासारिख्या मित्राखेरीज मला कोणाची सोबत बरी वाटत नाहीं खरी; परंतु तिकडील मार्ग वाईट ह्मणून, मला त्यांच्या संगतीनें चालणें प्राप्त झालें. आह्मी मार्गांत चालत असतां, एके दिवशीं मोठें अरण्य लागलें, त्यांत शिरून पुढें पाहतों तों, मोठा गलबा चालला आहे, आणखीं पुढेंसे जाऊन, पाहतों तों एका राजानें सेनेसहित येऊन तें अरण्य मृगयेकरितां घेरलें आहे, असें समजलें.

**प्रवाल०**—द्यूत, स्त्री, मृगया, मद्य, हीं चार व्यसनें राजाला अगदीं नसावीं, तीं घातक आहेत, असें नीतिज्ञ सांगतात, तरी राजे त्या नादांत असतात, हें मोठें आश्चर्य आहे!

**वसंत०**— इतर असोत, पण मृगया हें व्यसन वाईट नव्हे, असें वाटतें. कारण, त्यांत गुणलाभ बहुत आहे. एक; व्यायाम झाल्यामुळें शरीरांतील मेद झडतें त्या योगानें पराक्रम करण्यास शरीरांत पाटव (चपलता) चांगलें असतें. दुसरें; तिर्यक् प्राणी याच्या चित्तास भय झालें, तर त्याची मुद्रा कशी होत्ये, क्रोध आला, तर कशी, याचा परिचय होतो, तेणेंकरून त्याच्या अंतःकरणांतील क्रोधादि वृत्ति समजतात. चंचळ निशानाचा वेध करण्याचा अभ्यास दृढ होतो, आणि तो तर निशान मारणारांच्या मोठ्या प्रतिष्ठेस कारण आहे. मृगयेंत असे लाभ आहेत, यास्तव तिला व्यसन ह्मणूंनये.

**प्रवाल०**—खरें आहे. बरें, पुढें?

**वसंत०**—अरण्य मृगयेसाठीं वेढलेलें पाहून, आह्मा सर्वांचा विचार झाला कीं, आपल्यास पुढें लौकर जाऊन तरी काय करायाचें आहे? चार घटिका एथेंच राहून मृगयेचा चमत्कार पाहूं मग असें मनांत आलें कीं, आतां हें काहूर पाहून, श्वापदें बुजलीं आहेत, कदाचित् आमच्याकडे चाल करून आलीं तर काय करावें; इतक्यांत एकानें कल्पना काढली कीं, एथें वृक्ष मो-

ठे गगनचुंबी आहेत, यांवर चढून बसूं या, तो विचा सर्वांस बरा दिसला. त्यांत दोन कार्यें झालीं. एक, निर्भयता. दुसरें, लांबचाहि चमत्कार दिसला. यास्तव आह्मी मोठमोठया झाडांवर चढून बसलों, इतक्यांत स्वार, शिपाई, वनेचर, जिकडे तिकडे धावूं लागले. घोडे हिंसूं लागले. असें होतांच हरणें क्षांत पळून गेलीं. ससे वगैरे झुडपांतून दडाले. क्षुद्रप्राण्यांची अशी दशा झाली, पण क्रूर होते ते दडाले नाहीत. डुक्कर चवताळून घोड्यांवर चाल करूं लागले. उन्मत्त हत्ती धावून आले. वाघ गुरगुरूं लागले. असें जिकडे तिकडे प्राणी, किती एक भयानें व किती एक क्रोधानें व्यापिले ह्मणून, केवळ मोठ्या वादळानें खवळलेला समुद्र ज्यांत मोठमोठींहि तारवें कसपटाप्रमाणें होतात तसें तें रान अत्यंत घोर दिसूं लागलें; परंतु तशांत एक चमत्कार पाहिला! सिंहांच्या मनांत कोणताहि विकार उठला नाहीं. त्यांच्या स्वस्थतेंत काडीमात्र अंतर पडलें नाहीं. काय पराक्रमाच्या आधारानें धैर्याची बळकटी असत्ये! पहा बरें; एक सिंह व सिंही, आपल्या जाळीपुढें पाय पसरून निजलीं होतीं. इकडे फारच गलबा झाला, तेव्हां सिंहानें निजल्यानिजल्याच उगीच हेळनेनें मान वर करून धुंद झालेल्या डोळ्यांनीं त्या प्रदेशाकडे पाहिलें, आणि पुन्हा तो होता तसाच मान टांकून निजला. त्याची सिंही तर पतीच्या पराक्रमावर भरव-

सा ठेवून इतकी बेगुमान होती कीं, तिनें डोळे किल-किलेंहि केले नाहींत. व मान चाळविली नाहीं. याचें नांव आश्रय कीं, ज्याच्या आश्रितांस भयाची लेशभरहि माहिती नाहीं. धन्य ते आश्रित आणि तो आश्रय!

**प्रवाल०** – खरें आहे, असा पराक्रमी आश्रय ज्यास मिळेल तोच दैववान्. नाहीं तर घरोघरीं आश्रय आणि आश्रित आहेतच, परंतु, ते काय? 'तुह्मी पळा आणि मलाहि पळवा' असें ह्मणणारे आश्रय आहेत. बरें. पुढें?

**वसंत०** – नंतर पारध्यांनीं जाळ्या सोधण्यास आरंभ केला. ते आपली चाऊल श्वापदांस न व्हावी ह्मणून आपापल्यांत अगदीं हळू शब्दांनीं एकमेकाचें वारण करीत होते. एक म्हणतो, अरे, वाट सोड. दुसरा.— अरे, पाय हळूं ठेव, असा खजबजूं नको. तिसरा.— तो तिकडे काय शब्द होतो, पहा. चवथा.— अरे तू आपल्या कुतऱ्याला आवर. पांचवा.— तुझें हें हरण काय बावा गलबला करितें. (रानांतील हरणें जवळ यावीं ह्मणून ते एक हरणी बाळगितात.) असे ते मृगयेच्या कामांत सराईत झालेले एकमेकांस जेव्हां सावध करूं लागले, तेव्हां तें व श्वापदांची धांदल पाहून चार घटिका फारच अंतःकरण रमलें!

**प्रवाल०** – बरें. मग, शेवट काय झाला?

**वसंत०** – शेवट काय, प्रहर दहा घटिका असा

व्यापार करून, आस्वल, चित्ते, लांडगे, तरस, हरणें, ससे, इत्यादि लहान मोठे पशु व पक्षी मारून, सुमारें तिसरे प्रहरीं ते आपले सर्व लोक जमा करून निघाले. तेव्हां कितीएकांचा वेष असा बीभत्स दिसला कीं, त्यानें मन अगदीं विटून गेलें! त्यांनीं डाव्या खांद्यांत धनुष्यें अडकवून त्यांचें टोंक वांकडें असतें त्याला पांच सात ससे, त्यांच्या मागल्या तंगड्या बांधून अडकविलेले, त्यांच्या तोंडांतून रक्त गळत होतें, त्यानें त्यांच्या टांचा भरल्या होत्या! धनुष्याच्या प्रत्यंचेला कितीएक पारवे गुंतविले होते, त्यांच्या तोंडातून गळत्या रक्तानें त्यांचे भाते भरून लाल झाले होते! ते तर संतोषांत इतके दंग झाले होते कीं, त्यांच्या केसांत मोरांचीं पिसें बांधलीं होतीं तीं, केस त्या धांवाधांवींत ढिले झाल्यामुळें गळून पडत होतीं, त्यांचें त्यांस भान नाहीं. अशा समारंभानें ते तेथून निघाले.

**प्रवाल०** – वाहवा रे शूर! बरें, पुढें?

**वसंत०** – ते निघाले तेव्हां आह्मी सर्वहि झाडांवरून उतरून तें रान खडतर होतें यासाठीं त्यांच्या मागून जावें अशा इराद्यानें निघालों, परंतु त्यांच्या बरोबर काय आमची निभावणी होये? होईना, आणि अरण्याची सीमा तर बरीच लांब होती. मग आह्मांस विचार पडला, इतक्यांत पहातों तों अगदीं सायंकाळ होत आला, मग 'कसें करावें काय करावें' असा दशाक्षरमंत्राचा ज-

प करीत थोडेसे पुढें गेलों तों, एक शिवालय दृष्टीस पडलें, तें पाहिलें तों बरेंच, आह्मां सर्वांचा निर्वाह त्याच्या गाभाऱ्यांत होईल असें होतें. बाहेर मंडप मोठा होता, परंतु उपयोग काय? क्रूरश्वापदांचे अक्राळ विक्राळ शब्द होऊं लागले, ते ऐकून उघड्यावर राहाण्याचा हीय्या होईना, बायकोंचें एकुलतें एक फुकट मरून जाऊं असें वाटलें. दैववशात् तेथें देवाजवळच पाण्याचें टांकें होतें; मग तर अगदींच बिनदरद झालों. आणि चकमकेनें दिवा लावून, दार घट्ट बंद करून तेथें राहिलों.

**प्रवाल०**— असा तुह्मांस आश्रय मिळाला, तर दुसऱ्या दिवशींहि तेथें राहून स्वस्थपणानें आणखीं कांहीं त्या वनांत तुह्मीं चमत्कार पाहिले असतील?

**वसंत०**— होय. खरा तूं वनचर्येचा दरदी! आह्मा सर्वांच्या मनांत त्या वेळेस आलें कीं, देवाच्या दयेनें जागा निर्भय मिळाली आहे तर, अशा रमणीयवनाचा आणखीं कांहीं उपभोग घेतल्याखेरीज एथून जाऊंनये; मग सर्वांचा विचार एक करून, आह्मी दुसऱ्या दिवशींहि तेथें राहण्याचा बेत केला.

रात्रीं संध्या फराळ करून सर्व, दिवसभर उपोषण झालें होतें ह्मणून, निजलों तोंच चांगली झोंप लागली खरी, परंतु झोंप पुरती न होतां फार करून सर्व मंडळी जागी झाली. कारण, श्वापदांचे भयंकर शब्द जि-

कडे तिकडे भारी होऊं लागले. कांहीं वारा सुटला. विज चमकूं लागली. मंद मंद गर्जना चालू झाली. त्या देवळास दगडी जाळ्या होत्या त्यांपैकीं एका जाळींतून प्रकाशाची कांहीं झाक स्थिर दिसत होती, जवळ कोणी अति मंजुलस्वरानें गात आहे, असा भास झाला. तें गाणें केव्हां केव्हां तालसुरांत अगदीं बरोबर होत असे, व केव्हां केव्हां विसंगत होई; मध्यें तान होऊन जाई, तशी तर कधीं ऐकण्यांत येणारच नाहीं. तें ऐकून मीं ह्मटलें, अशा घोर अरण्यांत या वेळेस अशा मधुरगाण्याचा संभव कोठून ? गंधर्व रात्रीं विमानांत बसून फिरत असतात, अशी प्रथा आहे, ती खरी ह्मणावें तर, गंधर्वांचें गाणें मध्यें मध्यें विसंगत कसें होईल? तर कांहीं भूतचेष्टेसारिखें दिसतें. अशी आपली निजूनच कल्पना चालली आहे तों वाटलें कीं,इकडे ही प्रकाशाची झाक दिसत्ये, हें काय आहे, पाहावें बरें. मग लागलाच उठलों आणि त्या जाळींतून पाहूंलागलों तों, पलीकडे कळकाचें बेट आहे, आणि त्याच्या अलिकडे भुईवर एक स्वयंप्रकाश मणी आहे, अणखीं न्याहाळून पाहतों तों मोठा हत्तीच्या सोंडेसारिखा भुजंग फणा उभारून डोलत राहिला आहे आणि त्या कळकाच्या बेटांतून मध्यें मध्यें गाण्याचा ध्वनि निघत आहे. हें सर्व पाहून अनुमान झालें कीं, कळकांत कीचक ह्मणून जी जात आहे, ते कळक उन्हानें तडकले असतां

आंत वायु शिरतो, त्या योगानें त्यांतून ध्वनि फार मंजुल होतो. तर त्या जातीच्या कळकांचें हें बेट आहे, आणि त्याच्या या मधुरस्वराला लुब्ध होऊन हा महानंदांत निमग्न झाला आहे, हा ऐकीव चमत्कार तेथें बावा प्रत्यक्ष पाहिला!

ती मौज कांहीं वेळ स्वतः पाहून आपल्या सोबत्यांसाहि दाखविली, आणि मग जाग्यावर येऊन निजलों. पुढें सुमारें दोन घटिका गेल्या तों, दुसऱ्याकडून मोठे फुसकारे ऐकूं येऊं लागले, व मेघांची गर्जना चालू होऊन पाऊस पडूं लागला, देवळाजवळच एक तालवृक्षांची राई होती तीवर सळसळ शब्द होत होता त्यावरून व मृत्तिकेचा मधुर गंध सुटल्यावरून पाऊस पडत असल्याचें अनुमान झालें. नंतर इकडे कांहीं दिसेल तर पाहूं, असें योजून उठलों आणि त्या बाजूच्या झरोक्याजवळ गेलों. पाहतों तों चंद्रोदय झाल्यामुळें बरेंच दिसत होतें. बरें अगदीं जवळ मोटा फुसकारा ऐकतों हें काय आहे, ह्मणून पाहतों इतक्यांत विजेनें साह्य केलें त्या योगानें स्पष्ट दिसलें. तो हत्ती होता! पण तो केवढा? फारच मोठा होता. असा आपण कोणत्याहि राष्ट्रांत पाहिला नाहीं. मग त्याची ती आल्हादक मुद्रा चांगली स्पष्ट दिसूं लागली. वीज चमके ती मंद होती ह्मणून तेव्हां तर निःसंशय दिसे. त्यानें कानांचें वारणें अगदीं बंद करून तें

स्तब्ध ठेविले होते, वर तालवृक्षाच्या शेंड्याकडे तोंड करून सोंड त्या मुसलप्रायदांताच्या अग्रावर ठेविली होती, आणि डोळे अर्धनिमीलित करून तो ती पर्जन्याच्या धारांची सळसळ कान देऊन ऐकत आनंदानें परिपूर्ण होऊन एकसारिखा स्तब्ध राहिला होता. हें विजेनें जेव्हां मधीं मधीं स्पष्ट दिसे, तेव्हां त्या त्याच्या आकृतीवरून माझी जी काय प्रेमवृत्ति झाली ती आतां सांगतां येत नाहीं. त्या आनंदीप्राण्याचें चित्र माझ्या हृदयांत जें ठसलें तें अद्यापि तसेंच आहे. तर मृगयेच्या वेळेस त्या सिंहमिथुनाची, रात्रीं त्या भुजंगाची व या हत्तीची ही, अशी मौज पाहण्यास प्रसंग, लाखों रुपये खर्चून जुळवून आणूं ह्मटलें तरी येईल काय? येणार नाहीं. असे अद्भुत लाभ हे प्रवासीलोकांसच एकादे वेळेस प्राप्त होतात. परंतु यांपासून सर्वांस सारखाच चमत्कार वाटेल असें ह्मणवत नाहीं. प्राण्यांच्या स्वाभाविकप्रवृत्तीचें विवेचन करून तदनुसार त्याच्या त्या आकृतीचा ठसा बुद्धींत सांठविणें, ही मर्मज्ञता सुलभ नाहीं, आणि तो ठसा दुसऱ्याच्या मनांत उठे असें त्याचें वर्णन करणें हें तर अति दुर्लभ आहे. हें सामर्थ्य **व्यास वाल्मिक** यांचेच आहे व कांहीं अंशेंकरून तें त्यांचे प्रतिनिधि ह्मणविणारे **मुरारि, भवभूति, कालिदास** इत्यादि जे महाकवि यांत आहे; त्यांच्या ग्रंथांत हा प्रकार आढळतो.

**प्रवाल०** – खरें आहे. एकूण तू असे अद्भुत चमत्कार पाहण्याचा आनंदरस प्यालास नां? अरेरे! मला पहा, आकाबाईनें घेरून त्या **चित्रध्वजनगरांत** अडकवून टाकिलें! असो आतां तडफडून उपयोग काय? "गतंनशोचामि" या वचनाचेंच स्मरण केलें पाहिजे. बरें. पुढें? दुसऱ्या दिवसाची काय खबर आहे?

**वसंत०** – मग दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं क्रूर-श्वापदांची हालचाल पाहण्यासाठीं आह्मी त्या पुढील-मडपांत येऊन बसलों, तों सिंह, व्याघ्र इत्यादिकांची सामसूम दिसली. (नीटच आहे, ते प्राणी फारकरून दिवसां मोकळ्यावर आढळत नाहींत, त्यांची स्वारी शिकार रात्रीं असत्ये.) नंतर स्नानादिकांजोगें पाणी एथें कोठें असेल तर शोध करावा, या हेतूनें दाहापांचजण मिळून निघालों, तों फार लांब नाहीं असें एक लहानसें सरोवर सांपडलें, मग सर्व मिळून तेथें स्नानास गेलों; तेव्हां पलीकडे क्वचित् लाकुडतोडे वगैरेंचा संचारहि आढळला त्यामुळें आह्मांस बरेंच धैर्य आलें. नंतर आपलीं कामें करीत त्या सरोवराची शोभा पहात तेथें बराच वेळ रमलों. कोठें मोर आपले पिसारे उभारून आनंदानें नाचत, आणि मध्यें मध्यें मोठा मधुर शब्द करीत. कोठें पारवे गळ्यांतल्यागळ्यांत घुमत वरच्यावर गिरक्या मारून, आपल्या प्रियेचें चुंबन करीत. तेथील

कमलांची शोभा व जलजंतु, नानातऱ्हेचे पक्षी, यांची क्रीडा पाहतां पाहतां बारा घटिका दिवस आला. उशीर झाला असें जाणून आह्मी तेथून निघतों, इतक्यांत एक चमत्कार झाला. पलिकडच्या बाजूस एक मोठा माकड आला आणि तो पाणी पिऊन, (उन्हानें तापला होता ह्मणोन कीं काय,) पाण्याजवळच उताणा पडला. (आमची त्याकडे दृष्टि होती कीं, बरें हा काय करितो पहावें) इतक्यांत एक बारीक भुंगा एका कमळावरून उडून त्याच्या नाकांत शिरला. (त्याला त्याचें लाल मुख तें कमळच भासलें असेल असें वाटतें.) तेव्हां तो माकड हातानें आपलें नाक दडपून धरून व कान देऊन कांहीं शब्द ऐकण्याची मुद्रा करी. त्यावरून अनुमान झालें कीं, तो भुंगा त्याच्या नाकांत गुणगुण करीत असेल. मग काय? अगोदरच तो मर्कट आणि त्यांत असा प्रसंग आला; तेव्हां नाक तर तसेंच दडपलेलें असून, तो तोंड झाडी काय! रडे काय! उडे काय! पडे-काय! चरफडे काय! इकडे तिकडे धावे काय! चकित काय होई! तो वरचेवर कान देई आणि या प्रमाणें मर्कटचेष्टा करी. तो चमत्कार घटकाभर पाहून आह्मी आपल्या बिऱ्हाडाकडे निघालों, मग त्या पुढें त्याचें काय झालें कोण जाणें.

बिऱ्हाडीं आल्यावर कोणी स्वयंपाक कोणी पत्रावळी अशीं कामें वाटून घेऊन, मी कांहीं फुलें मिळवावीं

या हेतूनें निघालें, आणि फुलें जमवून जवळच एक मोठा बेलाचा वृक्ष होता, त्यावर चढला तेव्हां माझी दृष्टि कांहीं दूर गेली; मग पाहिलें तों एका वारुळाजवळ एक रीस मोठ्या आवेशांत आहे, इतका कीं तो क्रोधानें अगदीं अंधळा झाला होता. त्याच्या सर्वांगावरच्या लांब केसांमुळें वाटलें कीं हा एक काळोखाचा ढीगच केला आहे. तो वाळवींकिडे खाण्यासाठीं तें वारुळ तोंडानें पोखरीत होता, आणि आंत भुजंग होता तो क्रोधानें कांहींवर येऊन जेव्हां फणा मारी तेव्हां तो रीस एकदम उसळत असे. अशी त्या दोघांची झटपट चालली होती, ती घटकाभर पाहिली; नंतर मी उतरून बिऱ्हाडीं आलों.

देवळाजवळ आलों तों तेथें कोणी व्यापारी लोक माल घेऊन आले होते. त्यांबरोबर बरकंदाज हत्यारबंद शिपाई होते. कारण, ती मोठी प्रख्यात वारी आहे. त्यांस पाहून आमचा जीव चांगला स्वस्थ झाला. मग भोजन करून सुमारें तिसऱ्या प्रहरीं ते व्यापारी निघाले तेव्हां त्यांच्या बरोबरच आह्मी सर्व निघालों, ते आठ दिवसांनीं महाराष्ट्रदेशांत आलों, तेव्हां जीव खालीं पड- ला आणि मन चांगलें सुप्रसन्न झालें. खरेंच महाराष्ट्र आणि आर्यावर्त्त या दोन देशांप्रमाणें या हिंदुस्थानांत दुसरा देश नाहीं. दक्षिणेस पाहिलें तों, सर्व देश क्रोध, लोभ, मद, मत्सर यानीं भरलेले तामसप्राय आहे- त. वैष्णव, शैवसंसर्गानें आणि शैव वैष्णवसंसर्गानें

वाटतात. काय हा अडाणी समजुतीचा मताभिमान!! हा केवळ तामसपणा नव्हे काय? इत्यादि तिकडील जनांचे स्वभाव पाहून मला वाटलें कीं तो मुलुख रावणाचे घडशी राहण्याचें ठिकाण ह्मणतात तें खरें.

मीं त्या **महाराष्ट्र** देशांत आल्यावर ते सोबती सोडले कारण सोबत धरली ह्मणजे कांहींना कांहींतरी पराधीनता येत्येच. आणि ती आली ह्मणजे प्रसन्नता रहात नाहींच हें खचित आहे. मग नद्या, पर्वत, ग्रामें नवीं नवीं पाहून जेथें मन चांगलें रमेल तेथें चार दिवस रहावें. असें करीत तो सर्व देश पाहिला.

**प्रवाल०** — झालें कां? तूं जन्माचें सार्थक असा शब्द उच्चारून मला जें ऐकण्यासाठीं इतकी उत्कंठा उत्पन्न केलीस, तें यांतच का आहे? असेल तर होय ह्मणणें प्राप्त आहे, दुसरा काय उपाय?

**वसंत०** — नाहीं नाहीं, तें अद्यापि पुढें आहे; आतां एथून मी तिकडे वळणार असें समज.

**प्रवाल०** — मग चिंता नाहीं. चालूंद्या तर आतां.

**वसंत०** — मी फिरत असतां कृष्णातीरीं एक **मदनपूर** ह्मणून गांव पाहिला. तो बहुत रमणीय दिसला ह्मणून, त्यांत वसतीस जावें असा विचार करून कृष्णा उतरून गांवाकडे निघालों, तों इतक्यांत गांवांतील कुणबी जातीच्या पांच सात बायका पाणी भरून घागरी डोईवर घेऊन निघाल्या आणि आपआपल्यांत हळू हळू

बोलूं लागल्या; माझ्या मनांत आलें कीं बरें ह्या काय कुजबुजतात तें ऐकावें; ह्मणून, तिकडे कान व मन देऊन इकडे तिकडे पहात, कांहीं वेडे चाळे करीत त्यांच्या मागून चालता झालों.

**एक.**— काय ग बायजा, अपल्या पाटलाची ल्याक म्हंनी त्याचीं लै लाडकी हयू न्हाई?

**दुसरी.**— कोयन्ये कयू रांड ३. तू इक्त दिस त्येच्या इघाजाराला व्हऊन येरत. कांईबी तुला पारक न्हाई. पाटील काय भ्याला भ्वाळसाट, त्येला का प्वारीच कवसाल ठाव हयू; पन त्यो ऊदुगर ह्मौनीच भारी लाड करतो ह्ये तू कशावरून ह्मनूतीस.

**कोय०** — बयज, ह्मनी आठ दि "पिवळ अलवान् मला न्यासाया व्हव" ह्मनून इयेनी ह्याचा पाटी लागली हुती, त्ये आज पाटलान तिला दिल. अलवान लै ब्यास हयू. इक्तया साटा मी ह्मनूत्ये, ती ह्याचोलाड की, न्हाई तर त्यो किंडम रू इक्ता पैका खर्चायाचा हयू का ग!

**बायजी.**— कयन्ये, बरीच किग रांड ह्मौनी हिकमती हयू: तं ज्यानोच्या भराम्दी येऊन खमूखमूती हयू. मंग अस कवसाल कराना तर का!

**कोयनी.**— ह्येमूदो का तिच कवसाल झाल? तिन हवूसन मागितल असल.

**बायजी.**— कशाची रांड हवस! मला समूद

ठाव हय्. अताशी पाटलाच वड्याच्या कडच लै उ-च वाडलल सणाच झाड फूलून झेयनी पिवळ जराद झाल हय् न्हाई का, त्येसाठी तर तिला पिवळ्या अलवानाची हवस आली.

**कोय.**— व्हे काग! अतां उमंगल्ये मी तुज्या मनची ग्वाष्ट; पन कान् ग तिचा साग्या? तुला बर रांड असूल ल्वाकांच प्वाटातल गुज ठाव हुत.

**बाय.** — त्ये झाकत का ग कयन्ये? तवाच् मानसाचा इवळा फिरतो. अता साग्या सांगूच का? सकाळच्ये पारी घरोघरी पंचांगन सांगत फिरतो, त्यो म्येला ब्वाकयागत फुगलाला संब्यभट. अताशी त्यो पिवळी धावळ कांबरून झेयनी न्हाई का आपल्या घरीं पंचांगन सांगाया येत?

**कोय.**— व्हय् खर तू ह्मनत्येस. त्यो म्येला बामन सकाळ संद्याकाळ त्यो सनाच्य झाताकडच काई तरी काव्यान फिरत असतो खरा. न्हाऊद्य ग बया, आपल्याला अशा वरगळ ल्वाकांची पंचंत कशेला व्हावी; करील त्यो भरील.

**वसंत.**— इतकें बोलतात तों त्यांचीं घरें जवळ आलीं ह्मणून, त्या फुटून आपापल्या घरीं गेल्या. मी मनांत समजलों या **मदनपुराची** नावासारखी करणी दिसत्ये तर खरी. असा आपल्या अनुभवास येईल तें खरें. असें मनांत चिंतीत बिऱ्हाडासाठीं घरें टेहळीत

पुढें चालता झालों.

प्रवाळ०— पिवळ्या अलवानाची गोष्ट फारच खुबीदार आहे पण लोकांची इंगितज्ञता शर्थेची आहे, कशी तर्कानें खूणगांठ घातली पहा. बरें मग?

वसंत०— लोकांच्या इंगितज्ञतेचा अनुभव आपल्यास शेकडोवेळ येऊन फजित्या झाल्या नाहींत का? अस्तु. बिऱ्हाडासाठीं दहापांच घरें पाहिलीं तों माणसांची दाटीच दिसली. माणसें थोडीं असतील त्या घरांत राहवें असा मनांतील बेत. कारण. तेथें माणसाची परिक्षा व स्नेह लौकर होतो. मग पुढें पहातों तों, एक घर चांगलें स्वच्छ, ज्यांत माणसांची फार चाऊल नाहीं, असें दिसलें. तें बरेंसें समजून आंत गेलों तों एक अर्ध्या वयाची बायको ओसरीवर बसली होती, चर्या पाहून ती घरची सुखी असावी असें वाटलें. नंतर तिला म्हटलें कीं, महाराज मी वाटसर आहे, रात्रीं रहाण्यास कृपाकरून जागा द्याल तर मोठे उपकार होतील. अशी आर्जवी प्रार्थना केली तेव्हां ती ह्मणाली रहा बाबा तुह्मासारिख्याच्या उपयोगीं नाहीं तर, ती जागा घेऊन काय करावयाची आहे तें ऐकून चित्तास समाधान झालें; मग तेथें आपलें बिऱ्हाड टेविलें. इतका फिरलों पण मला ईश्वराची देहनगी आहे कीं, आजपर्यंत कोणी माझा कंटाळा केला नाहीं. उलटा जिकडे जाईन तिकडे पाहिजेच.

**प्रवाल०**— पाहिजेसा कां नाहीं होणार ? देवानें भाषणचातुर्य उत्तम, कंठ मधुर, वय तारुण्य, रूप सुंदर, स्वभाव आर्जवी, इतकें जें दुर्लभ, तें दिलें आहे. बरें बिऱ्हाड ठेविल्यावर पुढें काय खबर ?

**वसा०**— बिऱ्हाड ठेवून बसलों आणि त्या बाईस माहिती, यजमान कोठें आहेत, पुत्र किती आहेत, इत्यादि विचारण्यास आरंभ केला. त्यावरून बाईनें सर्व सांगितलें. यजमान रोजगारावर आहेत. दोन मुलगे आहेत, त्यांत एक हा लहान नुकताच शाळेंतून आला, थोरला सुमारें पंचवीस वर्षांचा आहे, तो इनामसंबंधानें दरबारांत जाण्याचें काम पडलें ह्मणून, दहा बारा कोसांवर गेला आहे, पांचचार दिवसांत येईल. त्याची बायको देवाला गेली आहे, अमळशानें येईल माझा भाचा एक आहे, तो नेहमीं एथेच राहून घरांतील व शेताची देखरेख करित असतो. आतांसे हंगामाचे दिवस ह्मणून तो रात्रंदिवस शेतांकडेच असतो, जेवण्यापुरता मात्र घरीं येतो. गडी आहे तो गुरावासरांची निगा करितो. इतकें असें आमचें कायतें कुटुंब आहे. तें ऐकून मी ह्मटलें बाई, फार दैववान् आहां. तुमची बुद्धि दयालु आहे, तर देव तुह्माला कां कमी करील !

असें बोलणें चालत आहे तों सूनबाई आली. तिजकडे पहातों तों, अरेरे काय सांगूं ! माझे पंचप्राण गोळा झाले, वीज चमकते त्या वेळची भावना झाली.

ते डोळे, तें नाक, तो घवघवीतपणा, ती पाहण्याची नोक, ते आंगलोट व दृष्टींत रंगेलपणा, ती चालण्याची ढब, ती हास्यमुद्रा आतां काय ह्मणून सांगूं! तें सर्व पाहून मला वाटलें कीं देवाच्या परिपूर्ण कृपेनेंच मला आज हें घर दाखविलें. आतां या कृपेचा शेवट कोठपर्यंत होतो पहावें. एक दोन वेळ कटाक्षलाभ झाला त्यावरून. निश्चय झाल्यादाखल होता कीं शेवट गोड होईल. ती सून येतांच हात पाय धुवून सासूबाईजवळ येऊन उभी राहिली आणि आज फराळास काय काय करूं असें सासूबाईस विचारून तेथेंच आंथरुणें घालायास लागली. बाईनें फराळास अमुक अमुक कर असें सांगितलें तों इकडे मला उगीच बसवेना. ह्मणून मी कांहीं निमित्तानें एकवेळ ओसरी खालीं पडवीत जाऊन पुन्हा वर आलों. इतक्यांत तिनें सासूबाईस विचारिलें हे कोण कोठील बावा? सासूबाई ह्मणाली, वाटसरू, रात्रचेरात्र जागा विचारीत आला ह्मणून, मी त्याला रहा ह्मटलें आहे. इतक्यांत ती हळूंच सासूला ह्मणाली. याला रातंदळें आहे असें वाटतें. सासू ह्मणाये, कोण जाणें बाई, असेल. मग सून ह्मणाये वाटसरूबावा, तुह्मांला रातंदळें आहे काय? तें ऐकून मला राग आला पण आपल्यास गुरुजींनीं प्रवासाची रीति सांगतानां असें सांगितलें आहे कीं, कोणी आपल्यास राग येईसें बोलला तर, शंभर अंक

मोजून नंतर विचारानें त्याला उत्तर द्यावें. ह्मणून उगाच राहून विचार करितों. तों मनांत आलें कीं कांहीं कारण नसतां असें विचारितये तर यांत कांहीं मतलब आहे. बरें कां होईना रातंदळें पतकरावें. अशा विचारानें मी होय ह्मटलें. त्यावर ती बोलली, बरें तर आतां दिवस आहे तों पाहून ठेवा. एथें मी निजत्ये आणि त्या आंथरुणावर सासूबाई गणुभाओजींला पुढें घेवून निजतात. रात्रीं तुह्माला खालीं अंगण्यांत जावें लागलें तर अडखळाल ह्मणून, आतांच दाखवून ठेवित्ये. तें ऐकून पूर्ण भरवसा आला कीं, सर्व हें कृपेचेंच लक्षण आहे. मग मी विचारिलें माझें रातंदळें तुह्मास कशावरून कळलें. तिनें सांगितलें आतां नुकती रात्रीची छाया पडत आहे, इतक्यांत तुमचें चालणें कांहीं चाचपडत दिसलें, त्यावरून मला भास झाला. तें आतां तुमच्या बोलण्यावरून खरेंच झालें. मी मनांत तर खचित समजलों कीं, सर्व हें थोतांड आहे. मग सासूबाईस ह्मटलें तुमची सूनबाई उगीच नाहीं बरं, मोठी चाणाक्ष बायको आहे. असो बाई अशीच असो आणि नवऱ्याचा संसार चांगला करो. त्यावर सासूबाई बोलली, बरें काय तुमचा ब्रह्मणाचा आशीर्वाद करील तें खरें.

मग मी जवळ विहिर होती तिचें पाणी आणून संध्या करीत बसलों आणि रातंदळ्याची संपादनी झाली

पाहिजे ह्मणून, सासूबाईस ह्मटलें. मी पाणी तर आणिलें आहेच, परंतु आणखी लागलेंच तर मला रात्रीं दिसत नाहीं ह्मणून, सूनबाईस तांब्याभर पाणी देण्यास सांगाल काय? त्यांनी ह्मटलें, बरें. मेलें पाणी तें काय? इतक्यांत सासूबाईस घरांत फराळास हाक मारिली. तेव्हां त्या गेल्या. मी आपलें फराळाचें होतें तें काढून फराळ करीत बसलों. तों सूनबाईंची स्वारी देवघरांतून डोकावून आंत गेली आणि सासूबाईस ह्मणते, तो ब्राह्मण शिळें पाकें खात बसला आहे. त्याला गणूभावोजींच्या हातून कांहीं फराळाचें देऊं कां? तें ऐकून मी मनांत ह्मटलें, आहे माझी इतकी काळजी ऊत्पन्न झाली यावरून माझें नशीब उदयास येत आहे. तिकडे सासूबाई ह्मणाली, दे, गरीब ब्राह्मण आहे. मग गणूभावजीच्या हातीं फराळाचें आलें तें काय? केवळ अमृतच. फराळ झाल्यानंतर सासूबाई बाहेर येऊन आपल्या अंथरुणावर बसली. तेव्हां तेथें कांहीं दिवस रहाण्याचें कारण उपस्थित केलें पाहिजे ह्मणून. मी ह्मटलें. बाई, तुमच्या या गांवास निवडुंगाचा आपला कोठच आहे गांवांत येतांना माझ्या पायांत कांटा घुसला, तो मी काढून टांकिला तथापि आतां त्याची जागा बरीच दुखूं लागली आहे, उद्यां चालूं देते कीं नाहीं; कोण जाणे. मला तर जाण्याची त्वरा आहे. सासूबाई बोलली, निवडुंगाचा उपद्रव आहे खरा, नाहींच

जांवलें तर रहा, मग दुसरा काय उपाय? नंतर मीं तोंडावरून पांघरूण घेऊन निजलें.

सूनबाई घरांतील वारासार करून बाहेर येऊन, आपल्या अंथरुणावर बसल्या आणि आपल्या सासुबाईस ह्मणतात. मघाशीं तो ब्राह्मण निवडुंगाचें काय म्हणत होता? सासूबाई म्हणाली त्याच्या पायांत कांटा लागला तो खुपतो म्हणून उद्यां जाण्याची त्याला निकड आहे. त्यास विघ्न होईल कीं काय अशी काळजी करीत होता. ऐकून सूनबाई बोलल्ये, हे वाटसरू असेच, चालून थकतात आणि कोठेंतरी पाय खोवायला पाहतात इकडे मी पूरा समजलों कीं सासूबाईच्या मनांत आपल्या मतलबाविषयीं लेशभरही दिकत न यावी यासाठीं ही सर्व माझी धिकारणी आहे म्हणून ती धिकारणी मला गुलाबाच्या पुष्पप्रमाणें प्रिय होऊन, गुदगुल्या करूं लागली. मध्यरात्रीं सुमारें दिवा गेला सर्व सामसूम झालें असें पाहून पाण्याचें पंचपात्र घेऊन मी पायऱ्यांवरून खालीं उतरलों पायऱ्याच्या बाजूस सासूचें आंथरूण आणि पलीकडे सुनेचें, हें मला दिवसाउजेडींच समजावेलें होतें. मग त्याप्रमाणें मीं त्या आंथरुणाजवळ जाऊन हातानें किंचित् चाचपिलें तों झोंप तर नव्हतीच पण कांहीं चळवळत कुशीस वळून मजकडे तोंड केलें आणि हातानें माझा हात धरिला. तेव्हां माझा जीव खालीं पडला, उरांतील धडकी कमी होत

घालली तोंपर्यंत मी शिर हातावर घेतलें होतें. साहसावांचून पराकाष्टेचें सुख नाहीं म्हणतात, तें खरें असें माझा त्या कालीं निश्चय झाला. श्वास सोडण्यास सुद्धां प्रतिबंध होता तरी त्या वेळचा आनंद काय सांगूं? सांगतांच येत नाहीं. तुला कधीं असा प्रसंग आला असला तरच, त्या आनंदाचें स्वरूप समजेल. "सुरतं तदेवसुरतं कृच्छ्रलब्धंयदन्यनारीषु" असे म्हणतात, ते खचित सत्यवादी आहेत.

झालें. मग दुसऱ्या दिवशीं कांच्याची बोंच कशाला बरी होईल? अधिक दुखण्याचें चिन्ह झालें. तिला चिंधो बांधिली, लंगडूं लागलों, कण्हत होतों, चार घटिका दिवस येईपर्यंत अशा प्रकारानें बतावणी केली. सासूबाई म्हणाली, कां बाबा तुम्ही कण्हतां? पाय अधिक दुखतो वाटतें. मी निजल्या निजल्याच होय महाराज म्हटलें. ऐकून ती बाई म्हणाली रहा तर आतां, जिवापेक्षां अधिक दुसरें कोणतें काम आहे? मी म्हटलें जाण्याची पुष्कळ तांतड केली तरी उपयोग काय? नशीब कोठें जाऊं देतें. नंतर उठून विहिरीवर मुखप्रक्षालन करावें या हेतूनें निघालों तों बाई म्हणाली. तुमच्यानें जाववत नाहीं तर कशाला जातां? थांबा. मी मुलीस सांगून तुम्हाला पाणी देवावितें. मी म्हटलें, बाई, बसून सुखावलों तर अधिकच दुखेल आणि अडकेल यासाठीं मी अशा अडचणीनें तरी

चालेन. तर लौकर मोकळा होईल. त्यांतून तें क्षत मोठें नाहीं म्हणून, पाणी शिरण्याचें भय नाहीं. केवळ कांट्याची बाच आहे. ती अशीच चालून चालून दबत गेली, म्हणजे आपोआप बरी होईल.

नंतर मी विहिरीवर जाऊन मुखमार्जन करून परत येत आहे, तों मला कांहीं दूर पाहून, सूनबाई सासूबाईस म्हणतात (ती बोलण्याची आकृति मी पाहिली, मग तिकडे कान देऊन कांहीं मिषानें जथया तेथेंच राहिलों.) वाटसरू ठेवला वाटतें. मोठे मेले चिकट भाकर. तें ऐकून सासूबाई म्हणत्ये, राहिना बापडा, आपण एखादा कडचणींत सांपडला असला. तर त्याच्या आव्हेर करूं नये. सर्वांस प्रसंग आहेतच; आपल्यास असा प्रसंग येणार नाहीं कशावरून? सूनबाई म्हणत्ये, असूंद्या; मी नको नाहीं म्हणत, पण आपल्याला उगीच एक माणसाचा चमत्कार सांगितला. पण आतां तो राहिला, तर त्याची दोन प्रहरची काळजी आपल्यासच केली पाहिजे. सासूबाई म्हणाली घालावें त्याला जेवायास, तेवढ्यापुरतें देवाने कांहीं आपल्याला कमी केलें नाहीं. तें ऐकून, सूनबाई मजकडे पाहून, हंसन्मुख होऊन, घरांत गेलीं.

पहा कशी छपावणीची युक्ति आहे. त्या वेळचे ते शब्द मनास दुःख अतिशय देणारे खरे; तथापि त्या मुखांतून निघाले ह्मणून, त्यांनीं माझें अंतःकरण

आनंदरमुरांत अगदीं लीन केलें. ठीकच आहे. लाकडास अग्निसंयोग झाला म्हणजे त्यांतून वाफ निघत्ये, ती धूरपणानें सर्वत्र सारखीच; परंतु चंदनकाष्टांतून निघाला म्हणजे त्या धुराला, धूप असें महत्वाचें नांव मिळतें. तसेंच हें शब्द विषयीं आहे. धिक्काराचे शब्द प्रियमित्राच्या मुखांतून निघाले असतां ते अतिशय सुख देतात, त्यांला विनोद हें नांव मिळतें.

असो. मग त्या दिवशीं काय? मेजवानीचा थाट. दैवयोगानें कसा असंभाव्य योग घडून येतो पहा. काय? मी अशा या दुर्लभ सुखासाठीं उपायाचा विचार व प्रयत्न केला होता? कांहीं नाहीं. पण योग कसा जमून आला पहा. यास उदाहरण तेथेंच मी सात आठ दिवस होतों तितक्यांत पाहिलें.

त्या गांवांत एका गरीब ब्राम्हणाचे दोन मुलगे, एक आठ वर्षांचा आणि दुसरा सुमारें तेरा चवदा वर्षांचा, असे होते. त्यांतून धाकटा फार सुरेख, सौम्य, गंभीर, असा दिसत होता त्यांचीं आईबापें दोन वर्षांमागें मेलीं म्हणोन, ते माधुकरी मागून पोट भरित असत. त्यांस एका पंतोजीनें अनाथ समजून फुकट शिकविण्याचें अंगिकारिलें होतें म्हणून, ते दोघे त्याच्या शाळेंत जाऊन शिकत असत. थोरला पोर फारच दुष्ट निर्दय अशा स्वभावाचा होता, तो त्या धाकट्याला घरीं दारीं छळित असे. ते दोघे माझ्या

बिऱ्हाडा वरून माधुकरीस जात, तेव्हां त्या दुष्ट पोराची धाकट्या बरोबर वर्तणूक अति कठोर पाहून मला फार दया आली, अंतःकरण तळमळें, पण काय करावें? तो थोरला पुढें चालत असतां, धाकटें मूल चोरट्या सारिखें होऊन, भीत भीत त्याच्या मागून वरचेवर दबकत चालत असे. थोरला तो वारंवार त्याला कांहीं तरी बोलण्यांत नडवून, त्याच्या आंगावर चवताळे, शिव्या अतिशय ऐकूं नयेत अशा देई, तोंडांत मारी, तरी तें लेंकरूं मुळमुळ रडत खालीं मान करून त्याच्या मागून जाई. दोन तीन दिवस लागोपाठ या प्रमाणें माझ्या दृष्टीस पडल्या मुळें, एक दिवस मला फार त्वेष आला. वाटलें, कांहीं तरी त्याचें शासन करावें, म्हणून मी दरवाजांत जाऊन बसलों. तों समोरच एक धनिकाचा वाडा होता, त्याचा धनी गृहस्थ तोही भोजन करून आपल्या दिवाणखान्यांत बसला होता, इतक्यांत रोजच्या माधुकऱ्यांच्या वेळेस ती जोडी आली. पाहतों तों, थोरल्याचा क्रम चाललाच आहे तो त्या धाकट्या लेंकराला निष्ठुरपणें क्रूर दुःसह अशा शब्दांनीं त्याच्या हृदयाला वेध करून गांजितच आहे, तेव्हां त्या गरीब लेंकराचे डोळे पाण्यानें भरले, तें अनाथ म्हणून दीनमुख होऊन इकडे तिकडे कोणी मला सोडविलि काय? अशा आशेनें पाहत आहे. मला वाटलें त्या समयीं त्याला

पुणे मराठी ग्रंथालय
१२७ ब, नारायण पेठ, पुणें २

सर्व दिशा शून्य दिसल्या असतील.

अशा प्रसंगांत, मी व तो दिवाणखान्यांतील गृहस्थ, पहातच आहों, तों त्या धाकच्या लेंकराला दैवानें कशी बुद्धि दिली पहा. तें लेंकरूं त्याला म्हणतें, दादा, मी अगदीं जपून चालतों तरी तुला राग येतोच आणि मला पाहून तुझ्या आंगाचा संताप होतो; तें तुला माझ्या साठींच दुःख भोगावें लागतें. तूं मला क्षणोक्षणीं झिडकारितोस, शिव्या देतोस, मारितोस, त्यानें मला दुःख होतें; पण नळाचें पाणी माझ्या हातास येत नाहीं, तेव्हां तूं काढून देतोस, अंघोळ करितांना माझें आंग पुरें भिजत नाहीं, व मला तें निर्मळ करितां येत नाहीं, तेव्हां तूं दात खाऊन रागें भरतोस, परंतु माझें आंग चोळून मला अंघोळ घालितोस, त्या वेळेस मी तुझ्या रागें भरण्याचें सर्व दुःख विसरतों. मला वाटतें कीं, माझी ममताळू आई आहेच. माझा दादा नसता तर माझी अशी काळजी कोण करिता? म्हणोन माझे आईबाप सर्व मला आतां तूंच आहेस. कोणीं मला छळिलें आणि त्यानें मी कष्टी होऊन रडत बसलों, तर मला पोटच्या लेंकराप्रमाणें आपल्या पोटाशीं धरून आंगावरून हात फिरवून धीर देण्यास आतां तुजवांचून कोण आहे? मी तुला सोडून कोणीकडे जाऊं! इतकें त्याचें तें कांपत कांपत बोलणें ऐकतांच (काय बावा त्या करु-

ण शब्दांचें सामर्थ्य) त्या तसल्याहि निष्ठुर पेराला ग हिंवर आला त्याचे नेत्र भरून आले आणि जसें ऐन उन्हाच्या वेळेस पाखरूं आपल्या पिलावर पाखर घालून बसतें, तसा तो त्या धाकट्या भावाला पोटाशीं धरून त्याच्या मानेवर मान ठेवून, मोठ्या दीर्घ स्वरानें रडूं लागला.. आणि ह्मणाला, अरे माझ्या लेंकरा बापड्या रघुनाथा, चंडाळा आज पर्यंत तूं मला कसें जागें केलें नाहींस. मीं दुष्ट कर्म चांडळ, आज पर्यंत काय रे मी ही बालहत्या केली. रघुनाथा तुला लेंकराला मीं उगीच आजपर्यंत भाजिलें, या साठीं मोठा दंड करून मला निर्दयाला कोण या पापा पासून सोडवील! असे नाना प्रकारचे विलाप करून तो मोठ्यानें शोक करूं लागला. त्या वेळची त्या दोघांची एक मेकांच्या गळ्यांची मिठी व तो त्यांचा विलाप पाहून पाषाण देखील उलले. मग आमचा माणसांचा पाड काय? तो प्रसंग जितक्यांनीं पाहिला तितक्यांस सर्व जग करुणमय झालें. इतक्यांत माझी दृष्टि त्या दिवाणखन्यांतिल गृहस्था कडे गेली, तों त्याच्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या अहित, रडल्याचे हुंदके वरचेवर येतात. ते त्याला आवरेनात, अशा अवस्थेनें तो खालीं उतरून आला आणि त्या दोघांला दोहों हातीं धरून घरांत घेऊन गेला. तेव्हां मीही त्या मागून गेलों. त्या गृहस्थानें लागलेंच दोन पंचे आणवून, त्या दोघांस

पांघरूण घातलें आणि घरांत लौकर भात करून या दोघांस जेवायास घाला, ह्मणोन ताकीद केली. आणि त्या मुलांस आश्वासन देऊन बोलला, तुह्मी दोघेही माझे पुत्र आहांत, जें पाहिजे, तें तुह्मी मजपाशीं मागत जा, काडी मात्र संकोच करूं नका. विद्या शिकून तुह्मास रोजगार लागे तों पर्यंत कोणत्याही गोष्टीची फिकीर न करितां, विद्या संपादन करा माझ्या शेजारीं तुमचीं आंथरुणें घालतील त्यांवर निजत जा. तेव्हां थेरला तो चोरट्या सारखा होऊन फार दिलगीर झाला होता. तो आपल्या अघोर कर्माचें स्मरण करून वारंवार दीर्घ सुसकारे टाकीत असे. लाजून मनांत चूर झाला होता. हें पाहून त्या सद्गृहस्थास वाटलें कीं, याला आतां फार पश्चात्ताप झाला आहे तर या दुःखांतून या मुलाला काढिलें पाहिजे. मग त्याला ह्मणाला अरे बाबा, तूं असा इतका कष्टी कां होतोस? तुझा स्वभाव वाईट नाहीं, तो फार चांगला आहे. दोन दिवस तुह्मा दोघांचेही नष्टचर्य होतें, त्याचें हें सर्व कृत्य आहे, तुजकडे तिळमात्र अपराध नाहीं. तूं आतां उगीच मनांत खंती करूं नको. माझी पूर्ण खातरी होऊन गेली आहे कीं, तूं मनाचा फार ममताळू आहेस. हें ऐकून त्यानें कांहींशीं मान वर केली. पहा वेळेचा गुण काय आहे! सात आठ वर्षांचें मूल बोललें काय! त्याला तें शिकविलें कोणीं!

त्या प्रसंगीं ऐकणारे मिळाले कसे! आणि त्याचा परिणाम कसा वर्णनीय झाला! तीं मुलें कोणाचीं, त्यांचीं स्थिति कशी होती, हें ती पाहिलेली गोष्ट मी बिऱ्हाडीं येऊन सांगितली, तेव्हां त्या घरच्या बाईनें सर्व सांगितलें, त्या वरून मला आश्चर्य अतिशय झालें. तर दैवयोग आला ह्मणजे अशीं आपोआप सर्व साधनें जमून येतात. तशीं माझ्या नशिबाच्या उदयाची वेळ त्या **मदनपुरांत** आली होती, ह्मणोन तेथें मला दरिद्याला अचिंतित निधिचा लाभ झाला

**प्रवाल**०— वाहवारे कारुण्य आणि वाहवारे मशारनिल्हे गृहस्थ.| दुसऱ्याचें दुःख पाहून त्याला रडण्याची मदत करणारे पुष्कळ मिळतात, परंतु असें अनाथाला पोटाशीं धरून त्याचें सर्वतः जन्म पर्यंत रक्षण करण्याची हमी घेणें, हें औदार्य निःसीम पुण्या शिवाय असत नाहीं. तर हा गृहस्थ खरा उदारांचा शिरोमणी. वाहवारे पुण्य श्लोक. बरें, चालूं दे आतां तुला निधिचा लाभ कसा झाला तें ऐकूंदे.

**वसंत**०— पुढें तेथें पांच सहा दिवस केवळ शृंगाररसमय असे गेले. लोक भीतिमुळें विनोद जो होई, तो मुक्यानें होई. परस्परांकडे सप्रेम पाहणें तें ज्याचें त्याला कळे न कळे असें होई. ह्मणूनच ती सुखाची अवस्था अनिर्वाच्य झाली. तिचा घरधनी लौकरच येणार, हें पूर्वींच मला समजलें होतें ह्मणून,

आदमास पाहिला तों त्याची येण्याची मुदत जवळ आली, त्या करितां माझी कांच्याची बेंच बरी होऊं लागली. मीं तेथून निघण्याचा उपोद्घात चालविला असतां तिकडे दिलगिरीचीं चिन्हें दिसूं लागलीं. त्या वरून मला फार अवघड झालें, पण उपयोग काय? लौकिकाचें वजन अधिक ठेविलें पाहिजे. त्यांत सुख होतें तें विशेष होतें. कोणी लोक, लज्जा सोडून निःसंग झालों ह्मणजे, आपल्या सुखास कांहीं विघ्न नाहीं असें समजून निःसंग होतात. परंतु मग त्यांत कांहीं अर्थ रहात नाहीं. त्याला पश्चात्ताप होत असतो. मनाचा स्वभावच आहे कीं, जें जें अत्यंत झांकलेलें असतें, त्या विषयीं तें फार उत्सुक होतें. मग कष्टानें होणाऱ्या त्याच्या लाभानें जसें तें अत्यंत सुखयुक्त होतें, तसें नित्य समक्ष असणाऱ्या अति सुंदरही पदार्थां पासून होत नाहीं. हा अनुभव सर्वांस आहे. पण कोणी त्याकडे लक्ष देऊन विचार करितात, कोणी करित नाहींत जे करित नाहींत, लोक लज्जा सोडून निःसंग होणें यांतच सुखातिशय आहे, असें समजतात; ते मूढ, सुखाच्या आभासाला सुख असें मानितात.

अस्तु– तिकडून तिच्या घरधन्याचा कागद आला, त्यांत मी परवाच्या दिवशीं घरीं येईन, असें लिहून आलें. तेव्हां मी त्याच्या येण्याच्याच दिवशीं, तेथून नि

घण्याचा निश्चय केला. मग ते दोन दिवस आह्मा उभयतांसहि परस्पर प्रेमाचें सुख आणि भाविवियोगाचें दुःख यांनीं मिश्रित ह्मणून हर्ष शोकमय असे झाले. त्या वेळची ती आमची अवस्था, कमळ आणि सोनचांफा या दोहोंवरून त्यांचा गंध घेऊन येणाऱ्या वायूपासून भ्रमरांची जशी होत्ये, तशी झाली. तो घरीं आल्यावर मी राहिलों, तर विशेष दुःख मात्र होईल. हें समजून मी तथून निघालों. निघतां वेळेस विरहदुःखाच्या वेदना ज्या झाल्या त्या काय सांगाव्या? पहा जें परम सुखाचें साधन प्रेम, तेंच विरहकालीं अत्यंत दुःखाचें साधन होतें. तें दुःख महिनाभर तर अगदीं तरुणावस्थेंत नित्य नवें असें होतें. नंतर कांहीं कमी होत चाललें. ठीकच आहे. सुख, दुःख किंवा दुसरा कांहीं कोणताही पदार्थ असो, काल हा सर्वांला जरा आणण्या विषयीं समर्थ आहे. हें तुह्मा आम्हा सर्वांला प्रत्यक्षच आहे.

**प्रवाल०**— अशा चतुर उत्तम स्त्रीच्या प्रेम रसाचा लाभ झाला, तर धर्म, अर्थ, काम मोक्ष, या चोहों पुरुषार्थांपैकीं तिसरा सिद्ध झाला, असें समजावें. तर, या वरूनच. तूं जन्माचें सार्थक, असा शब्द, प्रथम उच्चारिलास असें वाटतें.

**वसंत०**— नाहीं नाहीं, अरे, हें उगीच त्याचें पिलूं आहे. तें ऐकिल्यावर तूंहि खरें ह्मणशील, आतां उ-

गीच अगोदर कशाला बोलूं?

प्रवाल०— हूँ ३ असं काय? बरें बवा तर मग ऐकिलेंच पाहिजे, चालूंद्या काय तें तुझ्या या सुख संल्ला पांचा चमत्कार नदीच्या ओघा सारिखा आहे, गाढवा- च्या स्वरा सारिखा नाहीं.

वसंत०— कां गाढवाचें नांवसें आलें? तर आतां कांहीं थट्टेच्या आरंभाचा प्रवेश आपल्या मनांत झाला, असें दिसतं. माझ्या बोलण्यावर विश्वास नसेल, तर रा- हिलें बवा, पुरे करितों मजा कांहीं, आपण तें ऐकि- लेंच पाहिजे, म्हणजे त्या पासून मला मोठी पुण्यप्राप्ति आहे. असा इतका आपल्यावर भाव आहे, असें नाहीं,

असें त्याचें रुष्ट वचन ऐकून, प्रवालशेखर सम- जला कीं, याचें चित्त पुढील सांगण्याच्या वृत्तांतांत रंगलें आहे, त्यामुळें माझ्या बोलण्याचा अर्थ न समजतां हा रुसला, तर याला समजाविलें पाहिजे, त्या खेरीज याला पुढील मौज सांगण्यास हुरूप येणार नाहीं. म्हणून तो त्याला म्हणतो.

प्रवाल०— वसंतगुछा, कितीरे तूं वेडा झाला आहेस! माझ्या बोलण्याचा अर्थ मनांत न घेतां, उगीच गड्या मजवर रागावतोस!

वसंत० बरें बरें, पहूंद्या, काय अर्थाचा प्रकाश पडतो तो.

प्रवाल०— तुझें मन खळबळून गढूळ झालें आहे,

तों पर्यंत त्यांत प्रकाशाचें प्रतिबिंब कशाचें पडतें? तें शांत स्वच्छ होईल, तेव्हां पुढें तो विचार.

वसंत०— होय होय. खरें म्हणतोस गड्या, एवढा वेळ माझें मन विक्षिप्त झालें होतें, आतां उगीच तुझी जीभ कशास शिणवूं? पुढील गोष्ट ऐक म्हणजे झालें.

प्रवाळ०— नहीं नाहीं. तूं मोठा आंतल्या गांठीचा आहेस, मनांत गुंज ठेवून उगीच वरकरणी बोलत असशील, माझी खातरी होत नाहीं. प्रकाशाचें प्रतिबिंब पडलें तें कसें? त्याचें स्वरूप सांग बरें पाहूं मग मग माझ्या मनाची खातरी होईल कीं, तुझ्या मनांत कांहीं किंतु राहिला नाहीं.

वसंत०— हँ३ असें आहे काय? बरें तर ऐकावें. नदीचा ओघ पुढें पुढें अधिक मोठा होत जातो, कधींहि घटत जात नाहीं. गाढवाचा स्वर प्रथम दर्शनी मात्र मोठा दीर्घ असा होतो आणि पुढें क्षणोक्षणीं घटत जातो. कधींहि मोठा होत नाहीं- कां? हेंच ना?

प्रवाळ०— खरें समजलास. तर आतां विचार केल्यावांचून थट्टेचें जें तूं नांव काढिलेंस, तो तुझा अन्याय खरा ना?

वसंत०— होय बाबा, खरा अन्याय, त्या बद्दल कायदंड योजिला असेल तो सोसण्यास मी सिद्ध आहें.

प्रवाळ०— जा वेड्या, दुसऱ्यांनीं पुरावा केल्या पूर्वीं स्वतःजो आपला अन्याय कबूल करितो, त्याला

एकवेळ माफी मिळत्ये, दंड होत नाहीं. पुरे आतां लाडझगड, पुढील वृत्तांत चालूंदे, ह्मणजे झालें.

वसंत०— बरें, असें आहे तर ऐकावें आतां महाराज. पण गड्या आतां एवढावेळ चार घटिका बोलून माझी जीभ अंमळ थकलीशी झाली आहे, तर क्षणभर तुझें गाणें चालूंदे बरें, तुझें सुस्वर गाणें फार दिवस न ऐकिल्यामुळें माझे कान तान्हेले आहेत. गाणें ऐकिलें म्हणजे मला पुन्हा बोलण्यास उत्तेजन प्राप्त होईल.

प्रवाल०— ठीक आहे. आपण महाराज आणि मी आपला भाट आहें. म्हणून मला आपलें रंजन करून आपल्यास उत्तेजन आणिलें पाहिजे खरें, हें माझें कामच आहे.

वसंत०— झालें!! आला चरकीं. अरे, असा काय तूं अर्थाचा अनर्थ करितोस? तुझें गाणें बहुत दिवस ऐकलें नाहीं आणि तें अति मधुर आहे म्हणून, गा म्हटलें. तो तुझी दृष्टि भाटाकडे गेली, उपाय नाहीं. पण तूं भाटाचें नांव घेतलेंस त्या वरून मला एक स्मरण झालें. आपण चित्रध्वज नगरांत होतों, तेव्हां एका सणाच्या दिवशीं तुझ्या यजमानाच्या कचेरीचा थाट पाहण्यास गेलों, तेव्हां एक भाट राजाची बिरुदावळी बोलत होता, तींत राजाचे गुण आणि त्या त्या देशच्या स्त्रियांचा एकेक गुण समजावा, असें चातुर्य होतें.

तुला स्मरतें काय?

**प्रवाल०**— नाहीं. तुला त्यापैकीं कांहीं अनुभव आला असेल. म्हणून स्मरत असेल. कसें त्यांत वर्णन होतें सांग पाहूं.

**वसंत०**— भाटानें राजाचें बहुत प्रकारांनीं वर्णन करितांना ह्मटलें. हे राजा तुझें कुल, महाराष्ट्र देशच्या स्त्रियांच्या कुचा प्रमाणें उंच आहे; तुझा विनोद, लाट देशच्या स्त्रियांच्या शब्दा प्रमाणें मृदु आहे; तुझें मन, चेदिदेशच्या स्त्रियांच्या नाभी प्रमाणें गंभिर आहे; तुझी बुद्धि आभीरदेशच्या स्त्रियांच्या नितंबा प्रमाणें विशाल आहे; तुझी तरवार, गौड देशच्या स्त्रियांच्या केसा प्रमाणें काळी भोर आहे; तुझा रण प्रसंग, कर्नाटक देशच्या स्त्रियांच्या रति प्रसंगाप्रमाणें उद्दाम आहे; आणि तुझें यश, कीर देशच्या स्त्रियांच्या मुखा प्रमाणें स्वच्छ प्रसन्न असें आहे. असें वर्णन केलें, तें माझ्या स्मरणांत आहे.

**प्रवाल०**— अगोदर स्त्री विषयक जितकें असेल, तितक्याचें तुला स्मरण असायाचेंच, कधीं विस्मरण व्हायाचें नाहीं. माझी खातरी आहे. त्यांतून कांहीं तुला अनुभवाहि आला असेल, म्हणून विशेषें करून स्मरण राहिलें असेल.

**वसंत०**— होय गडया. तूं म्हणतोस तें खरें. अनुभव आला. रण प्रसंग कर्नाटक देशच्या स्त्रियांच्या

रतिप्रसंगाप्रमाणें उद्दाम आहे, असें जें म्हणाला, तें अगदीं खरें आहे. काय बावा तिकडील स्त्रिया उद्दाम! त्या प्रसंगीं त्यांचा तो उद्दामपणा काय शोभतो! आणि काय ह्रदयाला रंजवितो फार काय सांगावें त्यांला तो प्रसंग सर्व ब्रम्हांडभर श्रृंगाररसाद्वैत करितो.

**प्रवाल०**— शाबा३स. एकूण तुला जोशानें मुहूर्त फार उत्कृष्ट दिला आहे. असा कीं ज्या गांवीं जावें, तेथें कोणे एकेशीं तरी गांधर्वविवाह व्हावा.

**वसंत०**— तर आतां तुझ्या या बोलण्या वरून मला तुझ्या प्रवासाचें अनुमान करतां येतें. कारण तुह्मी आह्मी एकाच मुहूर्तावर घरून निघालों आहों, खरेंना? राहूदे आतां वावकळ भाषण, गाणाऱ्या लोकांचा स्वभावच असा. गा म्हटलें, ह्मणजे कांहीं तरी खुसपट काढून वाता मारीत बसावें. प्रहरभर बैठकीवर गाण्याच्या इराद्यानें बसले, तर गाणें अर्ध घटिका, आणि बडबड, आपली प्रशंसा, सात घटिका.

**प्रवाल**—० बरें. तूं असें ह्मणतोस, तर आतां चालू करितों हो, पण या प्रसंगावरून स्मरण झालें. तूं बरोबर सतार बाळगिली होतीस, तुला वाजविण्याचा छंद फार म्हणून ती तुझी अगदी जिवलग होती, ती या वेळेस साथ करण्यास असती तर मोठा रंग होता. पण ती दिसत नाहीं, काय केलीस?

*f. e. v.*

**वसंत०** तें आतां विचारूं नको, मी आपल्या मूर्खपणानें तिला जळसमाध दिल्ही. एक दिवस मी मार्गांत चालत असतां हातांत घेतली होती, ती हात अवघडला ह्मणून, दोन दिवसांचा एक सोबती भाड्याच्या तट्टावर बसून चालला होता, त्याच्या हातांत घटिकाभर संभाळील, म्हणून दिल्ही; तो भांग्या होता हें मला माहित नव्हतें. मग त्याचें तट्टू लौकर चालेना, भाडेकरी आपल्या चालीप्रमाणें थकलेलें तट्टू चालविण्याचें काम यजमानाकडे सोपवून आपण मागें राहिला होता, असें असतां तो तट्टाला झा झा ह्मणून टांचलून, थकला. मग तो त्रास आणि भांगेची तार यांमुळें त्याला कांहीं भान राहिलें नाहीं; माझ्या हातांत सोटाच आहे, असें त्याला वाटलें कीं काय कोण जाणे, ती सतारच उगारून, मागून मी पाहून हां हां ह्मणत आहें, तरी त्यानें तट्टाच्या टिरीवर खूप जोरानें सपाटा दिल्हा. मग काय पुसावें? तिचा खुर्दा झाला. त्या प्रहारानें तट्टू एक पाऊल देखील लौकर चाललें नाहीं पण माझा मात्र लाख रुपयांचा जिन्नस नाहींसा झाला. मागून भाडेकरी यानेंही ती सर्व कृति पाहिली आणि त्यानें दिक होऊन मला म्हटलें कीं, त्या चंडाळाच्या हातीं तुम्ही हो कसा आपला इतका नाजूक जिन्नस दिल्हात· तो भांग्या आहे, नेहमीं झिंगलेला असतो. अशी त्या सतारेची माती झाली,

त्यास कारण माझेंच मूर्खपण म्हटलें पाहिजे.

**प्रवाल०**— मग काय उपाय? तर आतां ऐक हो, गाण्यास आरंभ करितों. करूंना? पण अगोदर विचारतों तें सांग. मी राजसेवेंत असल्याचीं चिन्हें तुला दिसलीं. त्यांत तुझा स्वर कर्कश झाला आहे, हें एक चिन्ह असें तूं प्रथम बोललास, त्याचें स्मरण करून गायास सांगशील तर सांग.

**वसंत०**— अरे, चालूंदे लौकर; कितीं टाळाटाळ करशील. दुसऱ्याचा मृदु आणि तुझा कर्कश बरोबर आहे. मग त्या मित्राची अति उत्कंठा पाहून, **प्रवाल-शेखरानें** गाण्यास आरंभ केला तों काय! त्या आनंदांत कांहीं वेळ दोघांसही आह्मी कोण आणि आहों कोठें याचें भानच नाहींसें झालें **प्रवालशेखर** दोन घटिकापर्यंत अति सुस्वर गाऊन, नंतर विसावा घ्यावा म्हणून थांबला. इतक्यांत ते ज्या अंब्याखालीं बसले होते, त्याचा मोहोर एकदम झडून **प्रवालशेखराच्या** अंगावर व आसपास पडला. तें **वसंतगुच्छानें** पाहिलें.

**वसंत०**—वाहवा. चार वर्षांनीं आज गाणें ऐकिलें; सर्व श्रम परिहार झाले, अंतःकरण शांत झालें. तुला केवळ गंधर्वाचीच उपमा साजेल. पहा. या गाण्यानें संतुष्ट होऊन, तुजवर कोणी आकाशांतून पुष्पवृष्टि केली कीं नाहीं ती.

**प्रवालशेखरानें** आपल्या शरीराकडे व आसपास

पाहिलें. तों आंब्याचा मोहोर ताजाच पडला आहे. नंतर वर पाहिलें, तों डहाळीवर एक मोठा लालतोंड्या माकड बसला आहे. तें पाहून त्यास हंसूं आलें.

**प्रवाल०—वसंतगुच्छा**, हा वर गृहस्थ बसला आहे, हाच कायरे माझ्या गाण्याचा इतका दरदी? म्हणूनच यानें संतुष्ट होऊन मजवर इतकी पुष्पवृष्टि केली? अशी तूं शेवटीं थट्टा करशील ह्मणूनच मी टाळाटाळ करित होतों. समजलास?

**वसंत०** चांगला विनोदाचा मार्ग शोधून काढिलास. एकदम इतका मोहोर पडला, हा त्यानें वेंचून आपल्या पदरांत सांठवून, तुजवर टाकिला असेल ना?

**प्रवाल०**— बराच रानांत शिरतोस. अरे मर्कटाचा स्वभाव तुला माहित नाहीं काय? कीं तो जाऊन डहाळीवर बसूं लागला म्हणजे, पहिल्यानें गदगद डहाळी हालवून. नंतर तोवर बसतो. मग तशानें इतका मोहोर एकदम झडून पडणार नाहीं काय?

**वसंत०**— असेल बावा. तें कांहीं असो. एक मात्र खरें आहे कीं, मी इतके देश फिरलों, पण हा तुझा गाण्याचा मासला नाहींच कोठे आढळला. सर्व गोष्टीविषयीं तुजवर परमेश्वराची पूर्ण कृपा आहे. पुरें आतां. तूं बहुत श्रमलास. पण तूं श्रमलास त्यानें माझे श्रम दूर झाले, म्हणून मी आतां आपला इतिहास पुढें चालवितों.

मदनपुरची गोष्ट सांगितली. तिच्या अंतीं तें केवळ विरहदुःख मात्र सोबतीस घेऊन निघालों, कोठें-हि चैन पडेना. मग आपणच आपल्या मनाची समजूत करूं लागलों. अरे मना, तूं खेद कां करितेंस तुला हजारो उदाहरणावरून समजलें नाहीं काय! पहा संचयाच्या अंतीं क्षय. चढण्याच्या अंतीं पतन. संयोगाच्या अंतीं वियोग. आणि जीवनाच्या अंतीं मरण. हा नेमच आहे, कधींही टळत नाहीं. मग वियोगझाला ह्मणोन दुःख कां करावें? इत्यादि या वैषयिकसुखाची अनित्यता चिंतित पंढरपुरास आलों. कारण, तेथें महास्थान म्हणून, कोणी तरी साधु विरक्त भेटेल आणि त्याच्या संगतीनें आपल्यामनाची शांति होईल. परंतु तें कोठचें! या कलियुगांत जिकडे पहावें तिकडे रीत एकच. याचा मासला मला नुकतांच दिसून आला होता. मी पंढरपुराकडे वळलों तेव्हां शुक्लपक्षांतल्या एकादशीच्या वारीचे वारकरी मला आढळले. चार पांच गाड्या होत्या त्यांत कांहीं बायका कांहीं पुरुष मिळून सुमारें पंचवीस माणसें होतीं मग मी त्यांच्या संगतीनेंच चाललों. तों येतां-येतां पंढरपुरापासून दोन मजलांवर आलों आणि एका गांवीं रात्रीं रहाण्यासाठीं गेलों. पाहिलें तो तेथील धर्मशाळेंत दाटी झाली होती, ह्मणून आम्ही सर्व बाहेर मैदानांत एका तलावाच्या काठीं उतरलों. संध्या फराळ झाल्या

वर सर्व लोक निजण्यासाठीं आपापल्या खटल्याचा बंदोबस्त करूं लागले. त्या वेळेस, एका गाडींत एक पुराणिक आणि एक विधवा अशीं दोन माणसें होतीं, त्यांनींही आपला बंदोबस्त केला.

बंदोबस्त करितांना पुराणिक बावानीं काय वळकटी केली होती पहा. पुरुष मंडळींत बायकांनीं कसें निजावें ह्मणून दांडीला घोड्याचा धीर देऊन समान केलेल्या गाडींत त्या निजत असत. पुराणिक बावानीं भाडेकऱ्यानें तशी गाडी समान केली असतांही त्यास रागें भरून अधिक बंदोबस्त स्वतः केला. तो असा कीं, आपल्या वळकटीची दोरी त्या दांडीच्या टोकाला व पुढें ज्या लोखंडी मेखेला गाडीचे बैल बांधले होते तिला अशी ताणून बांधली कीं गाडीवर मागल्या बाजूस भार पडला तरी ती उरळूं नये. उरळण्याचा बंदोबस्त घोड्यानें होत नाहीं म्हणून त्यानीं ही युक्ति काढिली. मग भाडेकऱ्यास बजाविलें कीं बघ आतां, बाई झोंपेंत उठून गाडीच्या मागल्या बाजूनें उतरूं लागली तरी भय नाहीं. वाटेच्या कामाला असें दूरवर पाहिलें पाहिजे. नंतर ओझ्याची कंठाळ गाडीच्या पुढल्या बाजूस चांगली बसविली होती तिला उसें टेंकून बाई निजली. आणि पुराणिक बावा गाडीपासून फारदूर नाहीं असे निजले.

असे सर्व निजले तेव्हां मी.ही त्याच गाडीच्या

बाजूस किंचित् दूर निजलों, पण मला झोंप कोठची-त्या विरहदुःखाग्नीच्या ज्वाळा मधून मधून निघत होत्या त्यामुळें क्षणभर झोंप आली तरी ती अर्धवट येई. सुखाची गाढ निद्रा ती मला ठाऊकच नव्हती. त्यांतूनही तेथें एका पिंपळावर वनवाघळें जमलीं होतीं, त्यांची करकर चालल्यामुळें त्या रात्रीं तर तंद्राही नाहींशी झाली. पुढें मध्यरात्रीच्या सुमारें सर्व लोकांला गाढ निद्रा लागली, गाड्यांचे बैल देखील घोरत आहेत, चंद्र अस्ताचलाच्या अगदीं मस्तकावर गेल्यामुळें त्याचा प्रकाश मंद झाला आहे, असें सामसूम पाहून पुराणिक बाबा उठले आणि आपल्या गाडींत चढन त्या बाईच्या पायांकडे झाले. इतकें पाहून मी तिकडेंच न्यहाळूं लागलों. मला झोंप नव्हती व प्रकाशहि कांहींसा होता ह्मणून बरेंच दिसत होतें. जिंदगी फार बाळगिणारे वाटसरूलोक रात्रीं निजते वेळेस बरोबर चोराची धास्ती घेऊन झोंपी जातात. असा स्वभाव आहे याकरितां गाढ निद्रा लागली तरी ते थोडक्या कारणानें जागे होतात; ह्मणून ती बाई अर्धवट जागी होऊन चोर चोर ह्मणत उठून बसली राहिली त्या योगानें पुराणिकबावाचें व तिचें तोंड एकमेकांच्या समोरासमोर झालें.

इतक्यांत इकडे काय चमत्कार झाला? त्या अश्वत्थ वृक्षावर वनवाघळें घोळण्या घालित असतां त्यां-

पैकीं दोन आकाशांत एकमेकाशीं कळवंडून खालीं आलीं, तीं त्या गाडीच्या एका बैलावरच पडलीं; त्यामुळें तो बैल बुजून एकदम उसळला. तेव्हां त्याच्या हिसक्यानें, गाडीच्या दांडीची दोरी त्याच्या ज्या मेखेला ताणली होती ती भसदिशी उपटली. मेख उपटतांच ती गाडी अशी उरळली कीं तिची दांडी आकाशांत गेली आणि मागली बाजू जमिनीवर दाणदिशी आदळली.

मग काय विचारावें! प्रथम पुराणिक बावा जमिनीवर उताणे आपटले, लगेच त्यावर ती विधवा पालथी पडली आणि मागून कंठाळ गडगडत आली ती विधवेच्या पाठीवर अदळून, गाडीच्या अडचणींतून सुटल्यामुळें तिचीं दोन अर्धीं दोहो बाजूस होऊन जशी घोड्यावर लादावी तशीच बसली. इतक्यांत त्या गाडीच्या खडखडाटामुळें सर्व लोक जागे झाले आणि मार्गांत सोबती एकमेकांचे स्नेही नसले तरी अगत्य धरितात; ह्मणून सर्व त्या गाडीभोंवते जमले आणि पाहतात तों काय ! विपरीत सुरताची अद्भुत आकृति बनून आली आहे. मग काय? जिकडे तिकडे मोठाच हंशा पिकला. दुसऱ्या बायका प्रथम तेथें आल्या पण तो घाट पाहतांच पळून गेल्या आणि आपापल्या जागीं बारिक हंसत कुचकुच करीत बसल्या इकडे कंठाळीचा भार बाईवर आणि त्या दोघांचा भार बावावर यामुळें

दोघांतून कोणासच उठण्याचें अवसान येईना.

मग त्यांत थट्टेखोर होते त्यांचें बनलें. ते भोंताले स्वस्थपणें बसून थट्टा करूं लागले- एक ह्मणतो, - कां बावा विपरीत सुरताचा सोहाळा पुरे झाला कीं नाहीं. दुसरा० - अरे उतरा त्याचा भार नाहीं तर त्याचें दोंद चिंबून जाईल. तिसरा० - अरे गाडीवाल्या, सोडीव कीं आपल्या यजमानाला. गाडीवाला ह्मणतो— त्याला काय झालें उठायाला, गत्काळा बामण सुखावला अहेन काय. नंतर कोणी दयाळू होते त्यांनीं त्या दोघांला मोकळें केलें. पुढें तेव्हांपासून ती बोडकी आमच्या दृष्टीसच पडली नाहीं. पहा दैव विपरीत झालें ह्मणजे जो उपाय आपल्या कार्याच्या बळकटीसाठीं करावा तोच अपायाला कारण होतो. पुराणिकानें ती दोरी बांधिली नसती तर तो सावध रहाता, मग त्याला अशा फजितीचा प्रसंग आला नसता.

ही गोष्ट मी प्रत्यक्ष पाहिली ह्मणून माझ्या शोकाला केवळ वज्र अशी झाली. जेव्हां शोकाची अत्यंत पीडा होई तेव्हां या गोष्टीचें स्मरण करावें ह्मणजे झालें. तत्काळ, भस्माच्या दर्शनाबरोबर वैष्णव, ढेंकूण, मुंग्या आणि भुतें हीं जशीं दाहा दिशांस पळून जातात, तसा शोक या हास्यरसाच्या गोष्टीच्या स्मरणानें पळून जातो. त्यावरून करुण आणि हास्य हे दोन रस परस्पराचे शत्रु आहेत, असा जो रसज्ञांनीं सिद्धांत केला आहे तो

सत्य असें माझ्या अनुभवावरून मी सांगतों. नंतर तेथून निघून मी दोन दिवसांनीं पंढरपुरास आलों. तेथें पाहिलें तों त्या भक्त साधु ह्मणविणाऱ्यांचें श्रवण, मनन, निदिध्यासन, हीं कांता आणि कनक यांचींच आहेत. मग आह्मासारख्यांचें दुःख त्यांच्या संगतीनें कसें जाईल तें अधिकच वाढेल. असें वाटलें ह्मणून. तेथून निघालों. त्यावर इकडे तिकडे फिरतांना दोन चार महिने गेले, तेव्हां नवे नवे प्रदेश पाहून मन विरंगुळल्यामुळें त्या दुःखाचा कांहीं विसर पडत चालला. इतक्यांत पुन्हा भाग्योदयाचा समय आला ह्मणून. दैवानें स्मरपंजरनामक गांव आहे त्याचा मार्ग दाखविला, तेव्हां त्या गांवीं गेलों. मुख्य शहर तेथून दोन तीन कोसांवर आहे ह्मणून त्याला शहर असें विशेषण देत नाहींत; वस्तुतः पाहिलें असतां तें शहरच आहे

त्या गांवांत गेलों, तेव्हां कांहीं दिवसांनीं तेथें सभासाळि याची सुंदर, तरुण, विदग्ध (म्हणजे चतुर) अशा स्त्रीची गांठ पडली. तेव्हां ती मजवर इतकी फिदा झाली कीं मी मोठया अडचणीस्तव इकडे येण्यास निघालों असतां. पुन्हा लौकर परत यावें म्हणून, तिनें आपल्या अंगावरचे पांच हाजाराचे दागिने, कांहीं बाहाण्यानें कित्येक लोकां समक्ष मला दिल्हे. त्यावरून तिचे अनिर्वाच्य सौंदर्यादि गुण असोत. परंतु चातुर्याची पराकाष्टा पाहून, माझें मन अगदीं चकित झालें.

असें चातुर्य वैभव कोठें आढळलें नाहीं व आढळणा-रही नाहीं. तेणेंकरून मला असें वाटलें आहे कीं, सर्व सोडून जन्मपर्यंत तिचें दास्य करीत रहावें. धन्य तिचें चातुर्य खोटें वाटेल तर पहा हे दागिनें.

मग त्यानें गोट पाटल्या, तोडे, तोळबंद्या, वांकी सरी, वगैरे मोठे लंगर दागिने दाखवून ह्मटलें, पहा, तूं राजाचा चाकर होऊन जें संपादन केलेंस, तें मला दैवयोगानें याप्रमाणें दिलें आहे या खुणेवरून तूं त्या स्त्रीचें चातुर्य खरें मानून मी दैववान खरा, असें मानितोस कीं नाहीं?

**प्रवाल०**– अरे असूंदे, दागिने कशाला काढि-तोस, खरेपणाविषयीं माझा विश्वास, आपल्या डोळ्या-पेक्षां तुझ्या जिव्हेवर अधिक आहे आतां मला वाटतें खरें. तुझें सौभाग्य अतिशय आहे. जसें ज्या ग्रंथावर रसिकाचें चित्त आसक्त होईल तो ग्रंथ सरस. असा निश्चय ज्ञात्यांनीं केला आहे. तसें ज्या पुरूषावर चतुर स्त्री आसक्त होईल, तो पुरूष सौभाग्यवान्. तर तूं ह्मणतोस तें सर्व चातुर्यादिक खरें आहे, पण अशा मुग्ध सांगण्यानें मनाचें समाधान होत नाहीं. या करि-तां ही तुझी गोष्ट सविस्तर ऐकिली पाहिजे.

**वसंत०**– ठीक आहे. ऐक आतां लक्ष देऊन, त्या **स्मरपंजर** गांवांत जाऊन पाहतों तों जिकडे ति-कडे अत्यंत रमणीयता दिसली. त्याला सभोंवतें कुसूं

बागबगीच्याचेंच आहे, आंत लोक हृष्ट पुष्ट सधन, असे आहेत, पेठ मोठया घडामोडीची, सर्व व्यापार तेथें चालतात; त्या योगाने दारिद्र्याचें वारें माहीतच नाहीं कोणी दिलगीर दिसत नाहीं. शेट सावकार सायंकाळपर्यंत आपापले व्यापार करून, नंतर कोणी देवदर्शनास, कोणी बागांतून व्यायाम करण्यास, कोणी, नाच, तमाशे पाहण्यास, जातात; तेव्हां त्यांची अमीरी पाहून मनास मोठा आल्हाद होतो, असा तो गांव सर्व गुणांनीं परिपूर्ण आहे.

मग मी तेथें गेल्यावर, एथील पुरुष, स्त्रिया, बाल, तरुण, वृद्ध या सर्वांचीं भेट व त्यांच्याशीं भाषण कोणत्या योगानें होईल, अशा विचारांत पडलों तों भिक्षुकास कोठें प्रतिबंध फारकरून नसतो ह्मणून भिक्षुकीच्या मिषानें घरोघर फिरावें; असा हा उपाय मला बरा वाटला. मग मी बारा घटिका दिवस येईपर्यंत भिक्षुकवेशानें फिरावें, आणि दोन प्रहरून गांवांतील चमत्कार पहात फिरावें, असा क्रम चालविला.

बरें स्मरण झालें. हलकट अडाणी लोकांची समजूत पाहिली तर मोठा अचंबा होतो. एक दिवसमी फिरत फिरत गांवाच्या दक्षिण वेशींतून बाहेर गेलों तों पुढें कोष्टयांची आळी पाहिली. मग वाटलें यांचीं यंत्रें कशीं आहेत, यांचें काम कसें निर्भरानें चालतें, एथें माल कोणत्या मासल्याचा तयार होतो, हें सर्व

पहावें ह्मणून, त्या त्या कारखान्याच्या ठिकाणीं गेलों, तों काम काय?मोहोमदी मलमलली धोतरजोडे तऱ्हेतऱ्हे-च्या काठांचीं लुगडीं, यांचें काम पहून, मन संतुष्ट झालें. त्यांचें कसब फार उत्कृष्ट आहे नंतर तेथून निघून गावाच्या रस्त्यास लागलों. इतक्यांत, पुढे पांच सात असामी कोष्टी एकत्र जमून बसले होते, त्यांनीं एक त्यांच्याच जातीचा माणूस येतांनां लांबून पाहिला तेव्हां एकजण दुसऱ्यास ह्मणतो, कारे नारायणा हा सद्या येत आहे. हा गरीब, आल्लाची गाय, असा असून आज सात आठ दिवस कारे भांचोद, बावरल्यासारखा करितो ? (इतक्यांत तो जवळ आला.) पहा कसा हा अगदीं चवड्यावर, जणु जमिनीवर पाय पडतो कीं नाहीं कोण जाणें असा चालत आहे, पागोटें तेढें बाकें एका कानावर ठेवून दिलें आहे, छातीकडे पहात, मिशावर ताव देत केवळ उडत चालला आहे. अशी याला कोठें काय धण सांपडली ? दुसरा ह्मणतो,– अलीकडे याचे डोळे फिरले आहेत खरे, पण ते कां, हें आजून समजत नाहीं. इतकें ऐकून जवळ एक ह्मातारी उभी होती ती ह्मणत्ये, काय त्या मेल्या भाडखाऊचें तुह्मी विचारितां? ते ह्मणतात, काय बया, तुला कांहीं समजलें आहे वाटतें? ह्मातारी ह्मणत्ये,– ठाऊक काय असावयाचें आहे, त्याची बायको तरणी, देखणी, पण आजपर्यंत तिचा चांगुलपणा या मेल्याला

*f. f. vi.*

कोठें समजत होता? आतांसे शहरचे लोक तिला भारी भाळून जवळ लाळ घोंटीत बसतात. एक दोन तरी त्रितनी घरीं नाहींत असें होतच नाहीं; त्यामुळें माझा गुलाम इतका चढला आहे. तोंडानें आह्मापाशीं बोलून देखोल दाखवितो कीं, माझ्या बायकोवर शहरी, लोक जर इतको झड घालितात, तर माझी बायको खचित चांगली आहे, तिची सुरत खूपच आहे यांत संशय नाहीं. अशी सुंदर बायको मला देवानें दिली आहे, ह्मणून मी धन्य आहे; पहा तुह्मा कोणाला तरी शहरी· लोक विचारतात काय? यामुळें मेल्याला गर्व होऊन इतका वेडा झाला आहे. आणखी काय आपलें कपाळ सांगू? हें ऐकून ते सर्व त्याला छीः थूः करीत तेथून चालते झाले. कां? अधम मनुष्याची कशी समजूत असत्ये, पहा. जसें कुतरें केवळ हडूक चघळीत अ· सून संतुष्ट होतें तसे हे अधमस्वभावाचे, अब्रू बेअब्रू यांचा भेद न समजून, भलत्यानेंच गर्विष्ठ होतात अस्तु.

पुढें एके दिवशीं सोनारांच्या आळींत गेलों. तों एक सोनार त्याचें फुलझाडाचें कुडण फांटलें होतें तें सां· धित आहे, आणि त्रासून रागावून बोलत आहे कीं, काय बावा! या शेजाऱ्यांच्या गुरांनीं मला बेजार केलें! रोज मी बुजविणारा भला आणि तीं नवीं नवीं खंडारें पाडणारीं भलीं; बोलावें तर शेजारधर्म. थोड्यासाठीं वाईट व्हावें. पण आतां मी थकलों बावा! एखादे

दिवशीं गुरें धरून कोंडवाड्यांत घालीन, तेव्हां समजेल, रोज उठून काय हा जाच ? किती सोसावा. हें एका शेजारणीनें ऐकून, ती त्याला ह्मणत्ये. बाळदादा, तूं आमच्या नांवान कां हांका मारितोस? आह्मां गरिबांवर उगीच कां आग पाखडतोस? आमचीं गुरें रानांत जातात, त्यांबरोबर आमचीं माणसें असतात, तीं कधीं तुझ्या कुडणाकडे येत नाहींत; असें असतां तूं आह्मांवर रागावशील तर उपाय नाहीं. सोनार ह्मणतो तुमचीं गुरें येत नाहींत, तर माझें कुडण दररोज कशानें फाटतें, वाऱ्यानें होय? बेटें एक दिवस धड राहिना. शेजारीण ह्मणत्ये "सांगूं कां, रागावूं नकोस. हा तुझ्याच तोंडाचा गुण. तूं आपल्या या बोलघेवड्या तोंडानें ज्यात्यापाशीं आपल्या बायकोचे गुण गाऊन तिची तारीफ करितानास, तर असें कुडण कशाला फाटतें? आतां पहा तूं रोज कुडण धड करितोस आणि तें सकाळीं पहावें तों फाटलें आहेच, असें होतें. तें न व्हावें ह्मणून मी तुला युक्ति सांगत्यें ऐक. कोठेंतरी एक बेडें पुरून माणूस जाण्यायेण्यासारखी सवंतर वाट करून ठेव, ह्मणजे झालें, आतां दुसरा उपाय नाहीं. मग कुडण फाटलें तर मला विचार, त्याची जामीन मी." पहा लोकचर्या कशी गहन आहे! मनाला मनानेंच कुडून घेतलें तर ठीक नाहीतर कांट्यांचीं कुडणें किंबहुना पोलादाचे कोटही त्याला काय ए

के ठिकाणीं अडकवून ठेविणार आहेत? आणि मन जर माणसाला आपल्याबराबर ओढून नेईल तर त्याला प्रतिबंधकरणारा कोण आहे? त्या गांवीं दररोज असा एखादा चमत्कार दृष्टीस पडे आणि मन विस्मित होई.

अशा प्रकारानें त्या गांवीं मास पक्ष घालविला. नंतर एक दिवस मी मार्गानें जात असतां एका चवाठयावर गारोडयाचा तमाशा चालला होता, तेथें जाऊन पाहत उभा राहिलों, तों मोठा मांडीसारखा पिवळा जर्द एक नाग इकडे तिकडे सरणें फुसकारणें भूमीवर फडा आपटणें, हें सर्व सोडून आपल्या वेटोळ्यावर फडा उभारून, तो गारोडी नागसर वाजवीत होता तिकडे लक्ष देऊन, स्वस्थपणानें ऐकत होता. आनंदानें डुलत होता तें पाहून मोठा चमत्कार वाटला. इतक्यांत एक वेश्या, रूपानें सुंदर, तरुण, नखरेबाज अशी अंगावर जडजवाहीर पुष्कळ चढवून पेशवाचा थाट करून तेथें आली. ती माझ्या शजारीच तमाशा पहात उभी राहिली. मग नागसर ऐकून व त्या नागाची चर्या पाहून ती वारंवार विस्मय व कौतुक करी, तेव्हां भ्रुकुटींचें नर्तन व दृष्टीचे विलास व अंगाचें वलन इत्यादि हावभाव जे होत, त्यांच्या योगानें सर्व लोकांचा तमाशाचा नाद सुटून, तिकडेच ते गुंग झाले. असें होतांच मी तिला ह्मटलें. तूं आपल्या हावभावांनीं व कटाक्षविलासांनीं येथील लोकांच्या प्राणां-

चा पण करून जुवा कां आरंभिला आहेस? सखे, तूं एथून दूर जा. नाहीतर या तुझ्या कटाक्षबाणांनीं एखादा तरुण मृत झाला ह्मणजे पंचनाम्याचा प्रसंग येऊन या गरिबा गारोड्याच्या पोटावर पाय येईल, व तुला हत्या लागेल, तर या गारोड्याला आपला नाग निर्विघ्न खेळवूंदे आणि लोकांला स्वस्थपणानें पाहूंदे. असा मी तिचा विनोद करित आहे तों, बाजूस पाण्याचा हौद होता त्यावर मोठ्यांनीं भांड्याचा शब्द झाला. त्या बरोबर माझी दृष्टि गेली. तों काय! एक ब्राह्मणाची स्त्री रूपानें अप्सराच. ती तेथें घागर भरीत होती, तिजकडे माझी दृष्टि गेली व तिनेंही मजकडे पाहिलें; नंतर कांहीं वेळ मजकडे टौकारून पाहून ती काय बोलली (ऐक प्रवालशेखरा.) हा इतका गारोड्याचा कैवारी कोण एथें आला आहे! हें ऐकून तें सौंदर्य, व तें तारुण्याचें तेज, ती आयट. ते दृष्टिंचे विलास पाहून माझी तर चंद्रीच व्यापिली. माझें हृदय वरवर होऊन तरंगूं लागलें, सर्व नाडीचें आकर्षण वर होऊं लागलें. शरीर भूमिला स्पर्श करितें कीं नाहीं याचा मला संशय पडला. अशी ती अत्यंत प्रेमावस्था झाली आणि तिच्या त्या खोंचून पाहण्यावरून मला आशा उत्पन्न झाली. मग मी सर्व जनांचा निर्भर तमाशाकडे आहे, असें पाहून पाणी पिण्याच्या मिषानें त्या हौदावर गेलों. तेव्हां वारंवार मजकडे त्या चो-

ऱ्या पाहण्यावरून मला असें अनुमान झालें कीं जसें माझें ऱ्हदय इजविषयीं प्रेमावस्थेंत आहे, तसें इचेंही मजविषयीं झालें आहे.

नंतर तांब्या भरून घेऊन, बोलण्याचा उपक्रम करण्यासाठीं मी विचारिलें कीं, महाराज मी विदेशी आहे ह्मणून विचारितों, हें पाणीं गोडें आहे काय? त्यावर उत्तर ऐक. पाणी दूर नाहीं हातांत आहे, तांब्या तोंडास लावण्याचा मात्र अवकाश, आतां गोडें कीं खारें हें समजण्यासाठीं पराधीन कां व्हावें? जेथें लौकर प्रत्यक्ष समजणें अवघड, तेथें पराधीन होणें ठीकच आहे. इतकें ऐकून आत्मा तर गारच झाला. पण मोठ्यानें ह्मटलें [अरे बाबा हें काम तर मोठें आटोकाट व सडेतोड दिसतें.] ती कांहीं पाणी भरत्ये, कांहीं तमाशाकडे पहात्ये, तों मी घोटभर पाणी पिऊन उगीच ह्मटलें कीं, पाणीं गोडें नाहीं मचुळ आहे. ती ह्मणत्ये, तरीच पाणी हातांत घेऊन गोडें कीं खारें हें दुसऱ्यास विचारिलें. मी ह्मटलें. तर काय गोडें आहे? ती ह्मणत्ये. आह्मी इतकीं भांडीं स्वच्छ करून आदरानें नेतों तें काय वेडे म्हणून? मी ह्मटलें हें तर खरेंच; पण गोड कीं कडू समजणें हें खरें ह्मटलें तर जिभेचें काम होय, ह्मणून आपल्या जिभेवर भरवसा ठेवावा, दुसऱ्याच्या मुखांतून शब्द निघतील त्यांवर ठेवूंनये, हें योग्य, नाहीं बरें? ती म्हणत्ये.

कोणी भला माणूस आपल्या अनुभवावर विश्वास ठेवित नाहीं. नावेंत बसून चाललें ह्मणजे तीरचीं झाडें, मोठ्यावेगानें पळत आहेत असें प्रत्यक्ष दिसतें, पण तें काय खरें! खरें नाहीं. ह्मणून शहाणे केवळ आपल्या प्रत्यक्षावरच विश्वास ठेवित नाहींत. इतकें भाषण चातुर्य स्त्रीजातींत कोठें मिळेल? बोलण्यांत इतका वेळ गेला, तरी पाण्याची घागर भरत नाहीं इकडे गारोड्याच्या तमाशानें बरीच फुरसद दिली होती, पण मनांत म्हटलें आतां काय बोलावें? ज्या त्या शब्दांत मति कुंटित होऊंलागली- ती व मी बोलतानां एकमेकाकडे पहात नव्हतों. भांडें घासणें व विसळणें हें हातानें करित होतों. इतक्यांत तिकडून एक ब्राह्मण अंगानें पुष्ट गळ्यांत गोप, हातांत जोडवी, सलकडें, पागोटेंपैठणीं, धोतरजोडा रेशमिकाठी, अशा थाटानें आला. त्याला पाहून ती कांहीं वरमलीशी वाटली, तेव्हां काय आहे कोण जाणें असें मनांत आलें; इतक्यांत तो म्हणतो, केवढा वेळ हौदावर हा? घरीं मूल रडत असेल कीं? गारोड्याच्या तमाशाकरितां घागर भरत नसेल तर आपल्या घरींच एक दिवस करितां येईल, चलावें लौकर घरीं. हें ऐकून ती म्हणाली, अहा, मला कांहीं येऊन इतका फार वेळ नाहीं झाला. नंतर ती घागर घेऊन निघाली तेव्हां तोहि तिच्या मागुन तिकडेच चालला; त्यावरून मला वाटलें

ह्रा तिचा पतिच असेल, असो, पण आपण घर तर पाहून ठेवावें; मग मी हळूहळू मागून जाऊन घर पाहून ठेविलें.

नंतर बिऱ्हाडीं गेलों परंतु मन बिऱ्हाडीं येईना त्यानें त्या घरींच बिऱ्हाड घेतलें. त्यामुळें सर्वरात्र झोंप नाहीं, ती सुंदर आकृति पुढें पुढें दिसत्ये पण हातीं लागत नाहीं ; ह्मणून फारच तळमळ लागली. अशा विरहदु:खांत कशा तरी रात्र घालवून प्रात:काळीं विचार केला कीं, आतां मी घरीं गेलों तरी उपयोग काय? अंगाची आग मात्र अधिक होईल. तर प्रथम एकांतस्थळ योजावें, नंतर तेथें गांठ पडण्याचा उपाय करावा. मग मी सर्व गांव धुंडला परंतु कोठें निर्मनुष्य स्थळ आढळलें नाहीं ; इतक्यांत पूर्वीं स्वछंदानें फिरत असतां मला गांवाच्या अगदी बाजूस महादेवाचें देऊळ, ज्यांत माणसांची वहिवाट नाहीं, असें दिसलें होतें त्याचें स्मरण झालें, ह्मणून तेथें गुतलों ; तों गुरव नुकतांच पूजा करून निघाला होता. त्यास मी विचारिलें कीं, तुला या देवालयांत काय मिळखत होते? तो म्हणाला मिळखत कशाची? अगोदरच लोकांला देवाधर्माचा उल्हास त्यांत हें देऊळ अगदी एकीकडे पडलें आहे, योगी बैरागी आला तर तो मात्र एथें रहातो. माझी चाकरीच आहे म्हणून मी रोज या वेळेस पूजा करून जातो. मग मी म्हटलें बरें तर मला कां-

हीं योगसाधनच करायाचें आहे त्यास हें ठिकाण बरें आहे नाहीं? तो म्हणतो, खुशाल समाधि लाऊन बसा कोणी चूं देखील करणार नाहीं. तें ऐकून बरें वाटलें. नंतर दुसरे दिवशीं आनंदानें त्या घरीं गेलों, आणि प्रथम आंत काय हालचाल आहे म्हणून टोकाऊन पाहिलें, तों ती मुलास पुढें ठेऊन वेणी घालीत बसली आहे आणि यजमान कांहीं याज्ञिकाचें प्रकरण काढून विद्यार्थ्यांस शिकवीत आहे, असें पाहून भिक्षुकमिषानें आंत जाऊन त्याच्या जवळ बसलों. तों ती सर्वांगसुंदरी नखानीं केंस मोकळे करित असतां तिची त्या अंगुलीच्या सधींतून मजकडे दृष्टि येई ती काय सांगूं? जसें तप्त झालेल्याला खिडकीच्या जाळींतून प्राप्त झालेलें शरच्चंद्राचें किरणच. त्या अवलोकनांत प्रेमाचें चिन्ह विशेषच दिसून आलें खरें परंतु तें कसें दिसे? जसें भरधांव जाण्यासाठीं आवेशी झालेल्या अरबी घोड्यास भितऱ्या बसणारानें वारंवार अटकाव करून त्याचा मनोभंग केला असतां त्याच्या अवसानास कलंक जसा लागतो तसें. ठीकच आहे. कारण, लोकलज्जा प्रतिबंध करिते आणि एकांतीं गांठ पडण्याचा तर मार्ग दिसेना. मग मार्ग दाखविण्यासाठीं मी यजमानास बोललों. तुह्मास पहून संतोष झाला, असे विद्वान आतां आहेत कोठें ? मी यात्रेकरी आहे, तीर्थें फिरत फिरत येतांना हा तुमचा गांव मला चांगला रम्य

दिसला ह्मणून आठ पंधरा दिवस एथें रहून विश्रांती झाली ह्मणजे पुढें जावें असा विचार केला आहे. तें ऐकून यजमान ह्मणाले ठीक आहे. खुशाल रहावें. त्यावर मी म्हटलें खुशाल रहण्याजोगेंच आहे खरें, कारण, तुमच्या गांवचा कोतवाल मोठा हुशार आहे. पहा. मला स्नानसंध्या करण्यास एकांतीं राहाणें बरें वाटतें म्हणून मी गांवच्या पश्चिमेस अगदी ओसाड असें महादेवाचें देऊळ आहे, तेथें ( इतके माझे शब्द ऐकूनच सुतानें स्वर्गास जाणारी ती सर्वांगसुंदरी वेणीफणी आटोपलीशी करून तेथून झटकर उठून गेली. तेव्हां तें सर्व तर्कज्ञान माझ्या लक्षांत आलें. आणि आपलें काम झालें असेंच मी मानिलें; तथापि ज्याचा उपक्रम केला तें सोंपविलें पाहिजे नाहीतर मूर्खता येईल म्हणून व ती आडून ऐकत असेलच असें मनांत आणून, पुढें बोललों कीं,) राहिलों आहे. पाहिलें तों सकाळीं गुरव मात्र पुजेस येऊन जातो व एक ब्राह्मण ऐन मध्यान्हीं नैवद्य दाखवून जातो मग माणूस आढळतच नाहीं तरी माझें आसन, गवाळें, भांडीं, वगैरे पदार्थ सर्व सुरक्षित आहेत एक तनसडाहि हलत नाही. ह्मणून ह्मटलें कोतवाल फार हुशार आहे. यजमान ह्मणतो, होय. खरें ह्मणतां हा गांव मोठा धनाढ्य असून एथें चोरीचा उपद्रव किमपि नाहीं. इतक्यांत ती मुलाला यजमानापुढें ठेऊन मी अंग धुतें

गून घरांत गेली पण तेव्हांची मुद्रा कशी दिसली! एखाद्याचा चिंतेचा भार नुकतांच उतरून त्यास कृतकृत्यता वाटत्ये तेव्हां त्याची जशी दिसत्ये तशी. मग मी आनंदानें आपल्यास कृतकृत्यप्राय मानून तेथून निघालों आणि स्नान संध्येचें बिऱ्हाड घेऊन त्या देवळांत जाऊन बसलों.

**प्रवाल०**— वाहवारे कारस्थानी. पण गड्या मला या तुझ्या सर्व भाषणांत एक शंकास्थान आढळलें तें सांगतों ऐक. क्षणभर तुझ्या आड येतों. पूर्वी हौदाबरच्या गोष्टींत तिचे गुण सांगतानां तें तारुण्याचें तेज असें बोलसास आणि पुढें मुल रडत असेल व मूल यजमानापुढें ठेऊन असेहि ह्मणतोस. तर हें परस्पर विरुद्ध नव्हें काय? 'प्रसूतागतयौवना' असें ह्मणतात तें खरें नव्हें काय?

**वसंत०**— होय, ह्मणतोस तें खरें. एक आपत्य झालें तरी तारुण्य कांहीं डांकलक होतें; परंतु शृंगाररसाचें स्वरूप प्रौढावस्थेशिवाय कांहींच अनुभवास येत नाहीं. ज्ञानांत प्रौढता आल्याखेरीज कोणत्या गोष्टीचें काय रहस्य हें कळत नाहीं. केवळ तारुण्य ह्मणजे मुग्धावस्था, त्या अवस्थेंत पशूप्रमाणें व्यापार मात्र होतात. प्रेमरसाचा अनुभव ह्मणजे दृढ आलिंगन, चुंबन, रसभरित विनोदाचें भाषण, प्रेमाचा कोप यांनीं जो आनंदातिशय, तो तेव्हां दुर्लभ. त्या अवस्थेंत जर

प्रेमरसाचा अनुभव असेल तर तें अत्यंतातिशयाचें सुख म्हटलें पाहिजे ; पण तसें होतच नाहीं. म्हणून प्रौढा वस्थेंत जेव्हां प्रेमरस व शृंगाराचें मर्म कळतें तेव्हां त्या प्रौढ स्त्रिया मुग्धावस्थेचें स्मरण करून खेद करितात तो खेद अमरुक कवीनें लिहिला आहे कीं, 'मुग्धावस्थें-त होत्यें तेव्हां मी प्राणनाथ याच्या गळ्यांत हात घालून दृढ आलिंगन कां केलें नाहीं! तो चुंबनासाठीं झटत असतां मी तोंड कां खालीं घातलें! त्याच्या मुखाकडे कां पाहिलें नाहीं, तो बहुत प्रकारांनीं बोलवित असतां मी कां बोलल्यें नाहीं! तस्मात् मी अतिमूर्ख होय.' असें म्हणून प्रौढ स्त्रिया तेव्हांचें स्मरण झालें म्हणजे आप-ल्याला धिक्कारित असतात. असें आहे म्हणून मार्मिक ज्ञान व चातुर्याची वर्तणूक नाहीं, तर त्या केवळ तारु-ण्याला घेऊन करावयाचें काय! रत्न खाणींतून नि-घतें तेव्हां अगदीं कोरें असतें, म्हणून त्याला कांहीं तरी शोभा असत्ये कीं काय? त्याला चरकीं धरून पैलू पाडून पूट देऊन सोन्यावर जडावें, तेव्हांच त्याची शोभा झळकत्ये. असेच सर्व पदार्थांचे गुण स्वयंभू अवस्थेंत बीजरूपानें मात्र असतात, ते जेव्हां त्या त्या संस्कारांनीं प्रौढदशेंत येतात तेव्हांच त्यांपासून काय संतोष होणें तो होतो.

**प्रवाल०** — खरें म्हटलेस, अज्ञान असेंच दुष्ट आहे ; सर्व सुखसाधनें परिपूर्ण असलीं तरी तें सुखास्वा-

दन होऊं देतच नाहीं. जसा प्रकाशाला पडदा तसें तें त्याला आड येतें, म्हणून सर्व सुखाचें मूळ ज्ञान असें म्हटलें आहे. बरें चालूंदे पुढें.

**वसंत०**— अरे, पुढें काय चालतें. मागलेंच ऐक पुरतें. इतर स्त्रिया सारखी एका प्रसवानें तिची तारुण्यहानि झाली नाहीं, ती शरीराची धज, तें अवयवांचें प्रमाण व सौन्दर्य, व ती कांति, तो स्वर आजपर्यंत कोठेंच पाहिला नाहीं व ऐकिला नाहीं. यांत ब्रह्मदेवाचें मात्र वेडेपण दिसतें. पहा. लावण्यरूप धनाचा व्यय, त्यानें ही मूर्ति घडत्ये वेळेस गणिलाच नाहीं. मेहनत करून कष्ट तर पराकाष्ठेचे भोगिले; पण उपयोग काय? उगिच निश्चिंत असणाऱ्या जनाच्या मनांत चिंतारूप ताप मात्र उत्पन्न केला. बरें, उत्पन्न केली तिला तरी सुख असेल म्हणावें तर तसेंही नाहीं. ती आपल्या गुणाला योग्य पुरुष नाहीं म्हणून निरंतर मनांत झुरत आहे. मग इला उत्पन्न करतांना त्यानें कोणता पुरुषार्थ मनांत आणिला असावा बरें?

**प्रवाल०**— अरे कसा! गुंगलाआहेस. किती आपल्या सौभाग्याची बढाई करशील. पुरे आतां, सौंदर्य समजलें. चातुर्य काय तें पुढील संविधानांत कळणार आहे म्हणून आतां तें चालू कर.

**वसंत०**— ठीक आहे. ऐकावें तर महाराज. मी एकांतीं गांठ पडण्याचें ठिकाण सुचाविलेंच होतें.

मग त्याच दिवशीं सायंकाळीं एक जख्ख म्हातारी बरोबर घेऊन ती सुंदरी देवदर्शनास आली. आणि देवाचें दर्शन, नमन, प्रदक्षिणा करून म्हातारीला म्हणाली तिकडे बसले आहेत त्या साधूबावाचें दर्शन घेऊन त्यांस आपल्या कांहीं हित गोष्टी विचारू. बरें, अगोदर तुझा मुलगा आजवळीं गेला आहे तो अद्याप येत नाहीं त्याचें विचार, त्यांत कांहीं खूण पटली तर मग मी विचारीन. ह्मातारी बोलली, बरी बया आठवण केलीस. मग त्या दोघी येऊन नमस्कार करून माझ्या जवळ बसल्या. नंतर काय! माझ्या सर्वांगावर रोमांच उत्पन्न झाले. स्वेदानें सर्व शरीर भिजलें आणि तें थरथरूं लागलें, असा कामविकार अतिशय झाला, पण मी मध्यें मध्यें डोळे मिटून ईश्वरनामाचा उच्चार करून तें सर्व चिन्ह भक्तिभावाचें असें दर्शविलें. आपल्या मुलाविषयीं ह्मातारी प्रश्न करिते, इतक्यांत त्या सुंदरीनें मजकडे पाहून कांहीं डोळे झांकून आपला पेला चांचपडत उचलिला, त्यावरून मी समजलों आणि ह्मातारीस म्हटलें, तुझा मुलगा अंधळा आहे काय? म्हातारी ह्मणाली कसें महाराज आपल्याला समजलें? खरा अंधळा आहे. तेव्हां मीं ह्मटलें परमेश्वर माझें साह्य करितो. तुझा लेक शरीरानें खुशाल आहे, दोन तीन महिन्यांनीं येईल. हें ऐकून ती सुंदरी बोलली कां **तुळसा!** साधू बावा अंतरसाक्षी आहेत, नाहीं बरें? तर आतां मी आपलें

विचारियें ; पण तूं दरवाज्यांत बस आणि कोणी आलें तर मला खूण कर, कारण साधुपाशीं बोलत बसलें तरी आह्मासारख्या तरण्या बायकांला लोक नांव ठेवण्यास सोडित नाहींत. ह्मातारी ह्मणाली होय बया खरें आहे, मी जाऊन दरवाज्यांत बसत्यें.

ती गेली तेव्हां मी हळूं हळूं बोलत विचारिलें कीं, आपली काय विचारण्याची मरजी आहे. हें ऐकून ती ह्मणाली कीं हळूं बोलूं नये. ह्मातारीचें मन तरी शुद्ध राहील असा माझा भरवसा नाहीं. मोठ्यानें बोलावें. तें ऐकून मी मनांत म्हटलें, वाहवारे काय सावधगिरी आहे. मग मोठ्या स्वरानें विचारिलें कीं, आपलें सासर माहेर कोणतें ? आपल्यास मुलें बाळें काय आहेत ? प्रपंचाचें सौख्य कसें काय आहे ? प्रश्न कोणता करायाचा आहे.

नंतर तिनें तें सर्व सांगितलें. माझें माहेर **तिर्मली** गांवीं, सासरें याच गांवीं, माझें नांव **वसंतकलिका** घरधन्याचें नांव **सभासलि**, आम्ही या गांवचे ग्रामोपाध्ये आहोंत त्यामुळें आम्हाखेरीज कोणाच्या घरीं कांहीं धर्मकृत्य होत नाहीं. रोज दोन चार तरी रुपये घेऊन माझा घरधनी घरीं येतो. एक मूल झालें तें सुमारें सहा महिन्याचें आहे. इतकीं आम्ही कुटुंबाचीं माणसें तीनच, अलिकडे मुलास सांभाळण्यासाठीं ही म्हातारी **तुळसा** बिऱ्हाडास ठेविली आहे. यजमान अतिकृपण

आहे; म्हणून त्याला सर्वांपासून भय वाटतें, यासाठीं घरांत परकी माणूस फिरकत नाहीं. कामास गडी माणूस ठेवावें, देवानें आपल्यास सामर्थ्य दिलें आहे असें मी म्हणून पाहिलें; पण त्यानें सांगितलें कीं, तुला गडी माणूस पाहिजे किंवा दागिने पाहिजेत? दोन्ही मिळणार नाहींत. मग विचार करून मी म्हटलें, आपल्या घरांत काम फार आहे असें नाहीं, तर मला दागिने पाहिजेत ते तरी सर्व करून द्यावे. तेव्हां बरें म्हणून मला सराफी बुद्धीप्रमाणें सोन्याचे दागिने तितके सर्व मोठे ठसठशीत करून दिले आहेत. पहा हे गोट, तोडे, सरी, वांकी वगैरे कसे आहेत. द्रव्यास कमी नाहीं. पतीचें लक्ष प्रपंचांत फार आहे म्हणून तो बाहेर जाणें तें यजमानकृत्यापुरतें, प्रहर दिवसापासून तिसराप्रहरापर्यंत जात असतो; मग केव्हांहि जात नाहीं. यजमान पुष्कळ आहेत म्हणून कोणाच्या तरी घरीं कांहीं नित्यनैमित्तिक कार्य असतेंच. नाहीं असे दिवस थोडे. तो बाहेर जातो तेव्हां या म्हातारीला पुढले दारीं राखण ठेऊन स्वतां मी मागील दारीं एकटीच बसतें. काय करावें दुसरें माणूसच नाहीं. असें सर्व सांगण्यांत भेट होण्याची वेळ दाखवून शेवटीं तिनें प्रश्न केला कीं, मी कांहीं कार्य चिंतित आहे तें केव्हां होईल? नंतर मी सांगितलें आपलें दैव सबळ आहे आपल्यास कार्याच्या पाठीस लागण्याचें कारण नाहीं. कार्यच आपल्या पाठीस लागू-

न येईल अशी देवानें यावेळेस माझ्या बुद्धीस प्रेरणा केली आहे. इतक्यांत म्हातारी बोलली चला कीं बया लौकर संध्याकाळ झाली. घरीं देवाला जाऊन लौकर येते म्हणून परवानगी घेतली पण उशीर होत आहे कीं, इतकें ऐकतांच ती उठून चालती झाली.

नंतर मीही झाली कार्य सिद्धी. केली देवानें कृपा. असें समजून तेथून बिऱ्हाडीं गेलों. पण काय? दुसरें कांहींच सुचेना. सर्व लक्ष्य त्या सांगितलेल्या वेळे-कडे लागलें. रात्र मोठया संकटांत यथाकथंचित् घाल-विली. मग दुतऱ्या दिवशीं दहा घटिका दिवस आला असें पाहून त्या घराची वाट जेव्हां धरिली, तेव्हां साक्षा-त् आलिंगन चुंबन इत्यादि राहो, त्या मार्गास लागल्या-नेंच जो आनंद झाला तो सांगवत नाहीं. त्यानें सर्व मागचें दुःख विसरविलें. यावरून आतां साक्षात् अ-अनुभवाची गोष्ट कशी याचें अनुमान कर. पुढें साक्षा-त् अनुभव झाला तेव्हां तें स्वाभाविक अंगवलन, अव-लोकन, नेत्रमिलन, सीतकारादिकांची शैली, क्रीडा-चातुर्य, याचें कांहीं दिक्प्रदर्शन झाल्यावर मी अगदी निःसंशय झालों; आणि मला वाटलें कीं, माझ्यासारिखा धन्य या जगांत मीच. मी आज कृतकृत्य झालों. अशा आनंदांत सुमारें एक प्रहर तेथें क्षणासारिखा गेला. मग मी म्हटलें आतां जाण्यास परवानगी द्यावी. हें बरें नाहीं? तिनेंही आपली मोकळिकेची वेळ संपत आली

असें समजून दीर्घसुसकाऱ्याबरोबर मला सोडिलें, आणि मी निघालों तेव्हां सांगितलें कीं, ज्या दिवशीं कांहीं यजमानकृत्य नसल्यामुळें माझा घरधनी घरीं असेल त्या दिवशीं मदनरिपु जो स्थाणु त्याचें लिंग या दारापुढील ओट्यावर राहील. हें पक्कें ध्यानांत ठेवावें विसरूं नये.

नंतर आज्ञा, असें म्हणून मी बिऱ्हाडीं आलों. तेव्हांपासून त्याप्रमाणें क्रम चालू झाला. जीव खालीं पडला. जिकडे तिकडे स्वस्थता झाली. रोज त्या नेमलेल्या वेळेस अमृत समुद्रांत बुडून राहिल्या प्रमाणें त्या प्रेमरसाच्या अनुभवानें मनाचा अगदीं लय होऊन आत्यंतिक सुखाचें आस्वादन होऊं लागलें. कधीं कधीं इल्ला होई तेव्हां मनास फार तळमळ लागे, परंतु मी तें हितावहच समजत होतों. कोणताही प्रिय विषय असो अतिसेवनानें त्या विषयींचा हौंष कमी होतोच असा हा स्वभावच आहे, ह्मणून मध्यें मध्यें विराम झाल्यानें पुन्हा त्या विषयीं उत्कंठा उत्पन्न होऊन जो त्याचा उपभोग होतो त्यानें सुखानुभव उत्कृष्ट होतो. म्हणून दररोज वियोगदुःख आणि संयोगसुख असें चाललें तेणेंकरून मला तो सुखानुभव यथास्थित झाला असें होत असतां इतर वेळीं मी गावांत फिरून नवे नवे चमत्कार दृष्टीस पडत त्या योगानें मनास रमवीत होतों.

एका दिवशीं सकाळीं मी फिरावयास निघालों

तेव्हां एका घरीं वाजंत्री वगैरे मंगलवाद्यें यांचा ध्वनि ऐकिला, मग एथें काय चाललें आहे तें पहावें म्हणून मी त्या घरांत शिरलों आणि चौसोपींत एका बाजूस बसलों, परंतु काय आहे हें लौकर समजून घेतल्या शिवाय राहवेना, यासाठीं वाजंत्र्यांस विचारिलें कीं, आज एथें काय आहे? त्यानें सांगितलें शिळ्या ओटीचा समारंभ आहे.( गर्भाधानाच्या दुसऱ्या दिवशीं सकाळीं न्हाणवलीची जी ओटी भरतात तिला शिळी ओटी म्हणतात. )त्या समारंभास बहुत बायका जमून एकीकडे बसल्या होत्या, एकीकडे कांहीं मुलें जमून खेळत होती त्यांचा गलबा चाललाहोता, इतर कोणी आपआपल्या जमवा जमविच्या कामांत व्यग्र होते. अशी जिकडे तिकडे गलबल चालली होती. परंतु माझे डोळे व कान, ती न्हाणवली आपल्या खोलीच्या दारापुढें, केव्हां केव्हा पेंगते केव्हां केव्हां अंग टाकितें अशी अगदी पेंगुळलेली दृष्टीस पडली तिकडे होते. तिची आई एक आपली मैत्रीण घेऊन कोंकणांतून त्या लेकीच्या सोहाळ्यासाठीं आली होती, ती मैत्रिणीशीं बोलत कौतुक करित जवळ उभी होती- आई जों जों लेकीचें पेंगुळणें व अंग टाकणें पाहि तों तों खुष होऊन जावई तिकडे उभा होता त्याकडे अति अदरानें पहात असे. वरवर मात्र मैत्रिणींशीं बोले कीं, ( काय गे बाई देसुरे पुरुश दांडगे, चेडूं अगदीं कोमजलें परतें. ) पण

जावयाकडे हास्यमुद्रेनें पाही त्यावरून दिसून येई कीं, कंन्याबाईची ग्लानि पाहून तिला मोठाच संतोष झाला होता. ठीकच आहे. स्त्रिया पुष्ट पुरुषास फार चहा तात असें वेदानें सांगितलें आहे तें खोटें कसें असेल.

**प्रवाल** ० – अरे, ही तुझ्या अनुभवाचीच गोष्ट आहे, वेदाचें नांव घेऊन उगिच कशाला उदासीन होऊं पाहतोस. मी गैर माहित असेन तर सांग ; पण तूं सांगितलास चमत्कार हा मोठा खुबीदार आहे खरा आँ, बरें चालूं दे तुझी आवडती गोष्ट पुढें.

**वसंत** ० – माझी आवडती काय? बरें तुला आवडत नसली तर राहूं दे. वक्तयाला आवडत असलें तरी श्रोत्याला आवडत नसेल तर तें बोलण्याविषयीं उत्साह कसा होईल? उगीच खांबाला देखील पुढें करून बोलणारे नादिष्ट असतात त्यांतला मी नव्हें.

**प्रवाल**०– अरे असा काय तूं अगदीं मुलासारिखा वरचेवर विनाकारण चिडतोस. मी उगीचि विनोदानें बोललों. खरें विचारशील तर तुझ्या या गोष्टींत वारंवार कांहीं तरी मर्म निघतें ह्मणून माझी ऐकण्याची उकंठा उत्तरोत्तर वाढत चालली आहे.

**वसंत**० – असें म्हण तर, आतां चिंता नाहीं सांगतों ऐक. मी तें कोंकणीचें बोलणें व तिचा मनांतील अभिप्राय, आणि त्या अवस्थेंतलें त्या न्हाणवलीचें मनोहरत्व हें सर्व दुसऱ्या दिवशीं त्या प्राणप्रियेस

सांगितलें. मग काय विचारितोस! आकाशपाताळ एक झालें. ती डोळे लाल करून मजकडे पाहूं लागली; आणि निष्ठुरपणानें बोलली कीं गुलाम पुरुषाची जात. तिचा हा स्वधर्मच आहे कीं, त्यांनीं एक जागीं स्वस्थपणानें बसूंच नये, बायकांचें उघडें कोठें पडतें हें ज्ञाऱ्याप्रमाणें दृष्टि लावून पहात असावें, त्यासाठींच घरोघरीं फिरत असावें, त्यांतून तूं तर काय? जन्मापासून मुशाफर, बाराबंदरचें पाणी प्याला आहेस. कोणाच्या घरच्या बायका कशा आहेत, त्या करितात काय, बोलतात कशा, चालतात कशा, यांकडेच आयुष्याचा उपयोग होत आहे ना? बराच दैवानें मला असा परीस पाठवून दिला, असा मी काय त्याचा अपराध केला होता कोण जाणें, किंवा दैवास कां बोल लावावा? मीच चंडाळीण आत्मवैरी झालें, जिनें तुजवर स्वभावाची परीक्षा पुरती केल्याखेरीज विश्वास ठेविला. असें बोलत असतां डोळे पाण्यानें भरून आले आहेत, ओंठ थरथर कांपत आहेत, त्या वेळचा तो बनोट काय तुला सांगूं? वाटलें कीं, इला आणखी चिडवावें अशा अवस्थेंत दोन लत्ताप्रहार करील तर माझ्या शरिराचें सार्थक होईल.

**प्रवाल०**— हँ शाबास. पण एवढेशा दुसऱ्या स्त्रीच्या गोष्टीनें इतकें निकरावर आलें ना? एकूण खरी प्रीति तुजवर.

**वतंस०**— खरी ह्मणजे? संशय काय? सरस-स्त्रियांची भाषाच उलटी, हें तुला माहित आहेच. त्यानी स्वामिन् ह्मटलें ह्मणजे निष्ठुर समजावें, प्रिया असें ह्मटलें ह्मणजे साधारण, आणि गुलामा असें ह्मटलें ह्मणजे कृपा समजावी. अशी त्यांची भाषा रसिक लोक समजतात. ब्रह्मचारी किंवा अग्निहोत्री यांस ती कळायाची नाहीं. पण गड्या त्या वेळची ती आकृती मुखावर लाली चढली आहे, त्यावर घर्माचे बिंदु उठलें आहेत, कुरळकेंस पुढें येऊन लवलव हालत आहेत, ओठ थरथरत आहेत, डोळे गरगरित फिरत आहेत, तें सर्व पाहून त्या प्रसंगीं जसें माझें मन रंगलें तसें कधींच रंगलें नाहीं. पण त्या समयीं मी हातपाय जो-डून खालीं मान घालून चोरासारिखा पुढें उभा होतों.

**प्रवाल०**— मग? पुढें कोपाचा परिणाम काय झाला.

**वसंत०**— अरे सरसाचा परिणाम सरसच होतो. लघुस्वभाव जे असतात ते तृणासारिखे जळून जातात पण त्यांला द्रव येत नाहीं. उदारस्वभाव जे अ-सतात ते सुवर्णासारिखे, त्यांला द्रव आणणें अवघड नाहीं, त्यांस द्रव आणण्याचा उपाय अगदीं सुलभ आहे. मग ती सर्व तिची झडप कांपत कांपत सोसून घेतली, आणि शेवटीं चरणावर मस्तक ठेवून हातांनीं पाय घट्ट धरून ह्मटलें या दासाचे आजपर्यंत काय अप-

राध झाले असतील त्या सर्वांची क्षमा झाल्याशिवाय हे पाय सोडून मला दुसरी गतीच नाहीं. मी सर्वस्वी अपराधी आहें. मग काय. जे कोपाश्रु कढत होते तेच तत्काळ शीतळ प्रेमाश्रु झाले. मग मला उठवून आलिंगनचुंबन करून खालीं बसविलें, आणि हनवटी धरून ह्मटलें माझ्या मनांत कांहीं नाहीं बरें. मी उगी-च स्वभावांत कोमळपणा किती आहे हें पाहिलें. तें ऐकून अंतःकरण स्वस्थ झालें. समुद्राचें मथन करून त्याला क्षोभविल्यामुळें देवांस जसें अमृत मिळालें तसा मला त्यासमयीं त्या प्रीतीच्या कोपानें अत्यंत सुखाचा लाभ झाला.

पुढें त्यांवर आणखी दोन महिने गेले एकदर सुमारें सहामहिने त्या ठिकाणीं नित्य नव्या चमत्करा-चा अनुभव घेत राहिलों, इतक्यांत एक दिवस वडि. लांचें पत्र (मी मुकाम बदलला ह्मणजे घरीं पत्र पाठ-वून कळवित होतों त्यावरून तेथें) आलें. तुला जा-ऊन चारवर्षें झालीं, अद्यापि रोजगाराची वार्ताहि नाहीं उलटे घरचे दाहाबाराशें रुपये आजपर्यंत नेऊन खर्चिले आहेत तर आतां एकदां घरीं ये ह्मणजे झालें. तूं प्रवासांत असलास ह्मणजे आम्हास तुजविषयीं फा-रच काळजी लागत्ये, असें त्यांनीं त्या पत्रांत लिहिलें होतें. तें पाहतांच मनास दोहोंकडे ओढ लागल्यामुळें मी मोठा विचारांत पडलों, मग बहुत वेळपर्यंत योग्या-

योग्य विचार करून शेवटीं निश्चय केला कीं, वाडिलां, ची व मातोश्रीची मजवर ममता अतिशय आहे, माझा बहुत दिवस वियोग असल्यामुळें त्यांस दुःख होईल खरें. तर त्यांस दुःखांत ठेवणें योग्य नाहीं. एकदां त्यांस भेटून त्यांचें समाधान करून पुन्हा लौकरच इकडे यावें; परंतु हें प्राणप्रियेस कळवावें कसें आणि कळविलें ह्मणजे परिणाम काय होईल या विषयीं शंकाकुल होऊन मन फार व्यग्र झालें. जे जे विचार मनांत आणावे त्यांत दोष नाहीं, असा एकही दिसेना. न जावें तर पितृद्रोह, प्रियेस न कळवितां जावें तर कृतघ्नता, कळवून जावें तर निष्ठुरपणा, असे दोषजाल पुढें दिसूं लागले. कोणास बुद्धिवाद विचारावा तर तेथें कोणी मित्र नाहीं. मग सारासार पाहून आपल्याच बुद्धीनें ठरविलें कीं, निष्ठुरपण आलें तरी चिंता नाहीं, प्राणप्रियेस कळवून जावें, हेंच उचित होय.

नंतर दुसऱ्या दिवशीं भीत भीत वडिलांचें पत्र व त्यावर आपण केलेला निश्चय हें तिला सांगितलें. मग काय सांगावें! अनर्थाशींच गांठ. माझा विचार-कानीं पडतांच तिनें भुईवर घालून घेतलें, तिला वारंवार रोदनाचे उमाळे येऊं लागले, ती आपल्याकडून दाबित असे पण जों जों दावी तों तों शोक अधिकच शरीरांत दाटल्यामुळें सर्वांग थरथर कांपूं

लागलें. ती तिची अवस्था पाहून मला अतिशयच गहिंवरून आलें, त्यामुळें इहलोक परलोक यांची भीति कांहींच राहिली नाहीं. वाटलें कीं, आईबापांचें तिकडे कांहीं होवो, पण इची अवस्था अशी होत असतां उपेक्षा करून जाणें सर्वथैव आपल्यास उचित नाहीं. याप्रमाणें माझा विचार चालला आहे तो ती उठून मान खालीं घालून माझ्या अंगावर अंग टाकून घटिकाभर अगदीं स्तब्ध झाली. प्राण तरी शरीरांत आहे कीं नाहीं याची मला भ्रांति पडली. आणि मोठें भय उत्पन्न झालें असें असतां ती त्या मूर्छेतून कांहीं सावध झाली. आणि आपल्या बुद्धिवैभवानें योग्य विचार करून तिनें मला आश्वासन दिल्हें. पण त्या वेळची तिची ती निरहंकार झालेली मुद्रा पाहून माझें हृदय तर उलून गेलें.

तिनें आपला विचार कळविण्यापूर्वीं बहुत शोकमय विलाप केला कीं, सख्या प्राणवल्लभा, मला ईश्वरानें डोळे दिले नसते तर मी त्याचें मोठे उपकार मानिले असते. पहा त्या गारोड्याचा तमाशा होत असतां मी हौदावर तुला पाहिलें त्याच्या पूर्वीं मला हृद्रोग ह्मणजे काय हें माहित नव्हतें. पण तेव्हांपासून मला हृद्रोग लागला. झोंप, खाणें, पिणें, यां सर्वांवर माझें लक्ष्य नाहींसें झालें, तें तुझा साक्षात् संबंध होई तों पर्यंत. तो संबंध झाला तेव्हां ती सर्व

अस्वस्थता तत्क्षणीं नाहींशी झाली; पण आतां कधीं तरी मला वियोगाचा अनर्थ भोगणें प्राप्त आहे. यास्तव हा प्रियसमागम नव्हे, तर मी हे आपल्या हातानें प्रलय कालच्या अग्नीचे निखारे पदरांत बांधून घेतले आहे-त. असा पुढील विचार माझ्या मनांत आला, त्यामुळें मला नेहमीं धुगधुग लागून राहीली होती तीच दुर्दैवानें आज भोगिण्याकरितां माझ्या पुढें आणिली आहे-बरें तर आतां मला तरी तूं जावेस हेंच उचित दिसत आहे, पण मला या आतांच्या दुःखावरून जा असें ह्मणवत नाहीं. तरी तुझ्या मनाला रुखरुख न लागावी ह्मणून सांगत्यें कीं, जा; पण परत कधीं येणार हें सत्य स्मरून सांग, ह्मणजे मी त्या दिवसाकडे दृष्टी लावून तोंपर्यंत जीव धरून राहीन.

आतां, जरी तूं सत्य स्मरून सांगितलेस तरी वडिलांनीं जें पत्रांत लिहिलें आहे कीं, ( रोजगाराची वार्ताहि नाहीं उलटे घरचें दहा बाराशें रुपये या प्रवासांत खर्चिलें आहेत. ) त्यामुळें तुझें मन इर्ष्येला पडून रोजगाराच्या पाठीस लागेल, अशी माझ्या मनांत शंका आहे. त्या साठीं मी एक गोष्ट सांगत्यें ती तूं नाकारूं नयेस. तेव्हां तिचा मतलब मला न समजल्यामुळें ( मी कसा नाकारीन प्राणप्रिये? मला तुझी मरजी राखणें याशिवाय दुसरें कांहींच कर्तव्य नाहीं. वडिलांच्या भेटीस जाणें हें केवळ लोकलज्जेचें बंधन

आहे. आणि तें मनुष्याला असलेंच पाहिजे ह्मणून मी मानिलें आहे, तर आतां जाऊन चार महिन्यांनीं परत येईन. कसलीहि अडचण असो, मानणार नाहीं. ) या प्रमाणें तिला शपत वाहून सांगितलें.

त्या नंतर ती ह्मणाली असें तूं आतां ह्मणतोस तुझा निश्चयहि तसाच आहे खरा पण तेथें गेल्यावर जर वडिलांनीं कांहीं चिडविलें तर तुझें मन ईर्ष्येमुळें बदलेल, यासाठीं मी योजना केली आहे ती ऐक. माझ्या अंगावर नेहमीं असणारें सोनें सुमारें दहा बारा शेर आहे तें मी तुला देयें, आमच्या कृपणपणास मात्र आयुष्य असावें, मग मला दागिन्यास कमी नाहीं आणखी मिळतील, वडिलांनीं रोजगाराचें नांव काढिलें कीं लगेच दागिने त्याच्या पुढें ठेवून रोजगार केला कीं नाहीं पहा असें ह्मणन दागिनें त्यांच्या हवालीं कर हें जर कबूल करशील तर मी चार महिन्यांच्या मुदतीनें जावें असें सांगेन. नाहीं तर कसाया प्रमाणें माझा गळा कापून जाणें असेल तर खुशाल जावें त्याला अटकाव करण्याचें मला सामर्थ्य नाहीं.

हें तिचें भाषण ऐकतांच माझे पंचप्राण गोळा झाले, कांहीं उपाय सुचना, दागिने घेऊन जाणें बरें वाटेना, ती तर त्यावांचून परवानगी देईना, असें बहूंकडून संकट आलें. मग मी विचार केला कीं,

दागिनें आतां तर पदरांत घेतलेंच पाहिजेत पण पुन्हा येईन त्यावेळेस कोणत्या तरी युक्तीनें परत देईन. असा इत्यर्थ ठरवून दागिने घेण्याचें कबूल केलें, आणि विचारिलें कीं, दागिने देण्यास उपाय कोणता योजिला आहे? घरधनी लुब्धक आहे, त्याला इतके दागिने गेलेले समजतांच तो काय अनर्थ करील, आपला घात करून घेईल, किंवा तुझा करील, अशी ही गोष्ट मोठया भयंकर परिणामाची आहे; ह्मणून असलें कठोर भय बरोबर घेऊन जावें यापेक्षां आज हें जगच सोडून जावें हें मला बरें वाटतें, त्यावर ती ह्मणाली, घाबरेपणानें असें अमंगल बोलून माझें मन अगोदरच उदास झालें आहे त्याला आणखी कुपथ्य घालूं नको. सांगत्यें ऐक, परिणामाविषयीं तूं कांहीं काळजी करूं नको. मी बुद्धि सांगत्यें, ऐकून त्याप्रमाणें चाल ह्मणजे झालें, परिणाम वाईट होणारच नाहीं. किंबहुना आतां जी स्थिति आहे तिजपेक्षां अधिक चांगली होईल, काडीमात्र चिंता वाहूं नको. असें बोलून त्या चतुर शिरोमणीनें माझें कर्तव्य तितकें मला पढविलें. आणि आपलें काणकोणतें तेंहि सांगितलें. तें सर्व ऐकून तिच्या बुद्धिवैभवाविषयीं मी तर बावा थक्क होऊन गेलों काय ही देवाची तिजवर कृपा!

नंतर मी बिऱ्हाडीं आलों, तों काय? ती शोकाची दशा अतिशय दुःख देऊं लागली. मन जेव्हां

विलाप करून अगदीं थकलें तेव्हां त्यांत विचार उत्पन्न झाला कीं, आशा हें जीवनाचें आलंबन आहे. तर ती आशा आपल्यास खचित आहे ह्मणून चारमहिने पर्यंत विरहदुःख सहन करण्यास त्या पुढील आशेच्या बळानें कठिण नाहीं, तर आतां चारमहिनेपर्यंत निराश होऊन आपल्यास उपदेशिलेल्या कर्त्तव्य उद्योगावि-षयीं आपण उमेद धरावी, हेंच या प्रसंगीं युक्त आहे. असें मनाला धैर्य देऊन जवळच्या मोठ्या शहरांत गेलों आणि भाड्यानें मेणा, घोडा, दोन गडी, यांचा ठराव करून त्यांस बरोबर घेऊन बाजारांत गेलों, तेथें एक मृन्मय लक्ष्मीची मोठी मूर्ति, विड्याचीं पक्कीं पानें वगैरे सामान व केशरीतेल इत्यादि सर्व पदार्थ घेऊन मेण्यांत ठेवविले. मेण्याचीं दारें बंद करविलीं आणि सायंकाळीं पुन्हा त्या मदनपंजर गांवीं आलों तेव्हां मी शिलेदारी डौल केला होता. मग त्या सभासली ब्राह्मणाच्याच घरीं बिऱ्हाडासाठीं जागा विचारित गेलों. इतक्यांत अगदीं झांजड झाली. पहातों तों संकेता-प्रमाणें ती सुंदरी देवदर्शनास जाऊन दरवाजांत नुकतीच पोंहचली होती. मग मी तिला विचारिलें कीं, आह्मास आपल्या घरीं बिऱ्हाडास जागा मिळेल काय? प्रातःकाळीं आह्मास एथून पुढें चंद्रपूर गांवीं जायाचें आहे. एका रात्रीसाठीं जाग्यास दोन रुपये पडले तरी चिंता नाहीं. हें ऐकून ती ह्मणाली थांबा अंमळ

मी यजमानास विचारून काय तें सांगत्यें. असें बोलून ती घरांत गेली, मग मीहि आपलें खटलें दूरच ठेवून तिच्या मागून आंत गेलों. नंतर तिने पतीस विचारिलें तेव्हां पति ह्मणाला खटलें कितीसे आहे! तेंव्हां मी बोललों कीं, मी व माझें कुटुंब आणि मेणा इतक्यांस मात्र जागा पाहिजे बाकी भोई वगैरें सर्व खटलें बाहेर राहील. आह्मास हा पुढील सोपा कोपऱ्याच्या खोली सुद्धां दिलात ह्मणजे बस्स होईल. आमची मराठमोळ्याची चाल आपणास माहित असेलच. ह्मणून खोली मात्र अवश्य पाहिजे हल्लीं उन्हाळा जबर आहे, ह्मणून मी तर बाहेरच निजणार कुटुंब खोलींत राहील, पण एक मात्र विनंति आहे. आपल्या पुरुष मंडळीची फारशी इकडे वहिवाट नसावी. मग तो सभासाले ह्मणाला, स्वस्थ रहावें. आमच्या घरीं पुरुष दुसरा कोणी नाहींच. हें ऐकतांच मी खिशांतून दोन रुपये काढून त्याच्या पुढें ठेविले ते घेऊन तो संतुष्ट झाला.

नंतर मेणा आंत आणविला मनुष्यांस सांगितलें कीं, तुह्मी बाहेर मैदानांत रहा. घोड्याचा बंदोबस्त चांगला ठेवा. खंदा आहे, सबब कांहीं कारणाने खिजेल तर संभाळा. रात्रीचा समय आहे. मग मी मेण्याचें दार किंचित् उघडून आंतलें मिठाई, विड्याचें सामान वगैरें घेतलें. असें कीं, त्या वेळेस त्या ब्राह्म

णास आंतली ती लक्ष्मीची मूर्ति कांहीं दिसली न दिस-
लीशी होऊन स्त्री आहे असा भास व्हावा. मग ब्राह्मणास
ह्मटलें, महाराज आपण किंचित् आंत जावें ह्मणजे
माझें खटलें मी खोलींत नेईन. ती सुंदरी दाराआड
उभी राहून हें सर्व पहातच होती, ती मनांत [ आपला
शिष्य बराच हुशार आहे ] असें ह्मणत असेल असें
मला वाटलें. मग ब्राह्मण आंत गेला, इकडे मी मेण्याचें
दार एक दोन वेळ उघडून मोठ्यानें खडखडावून
बंद केलें. नंतर ब्राह्मणास हाक मारून ह्मटलें कीं,
आपण अंमळ इकडे यावें. तेव्हां तो आला. त्याला
मी बोललों कीं, आपण आपल्या कामाकरितां बाहेर
गेलां तरी चिंता नाहीं, आपण शिष्ट आहां असें मी
या गांवांतून जातां येतां कधीं कधीं ऐकिलें आ-
हे; आतां बरोबर कुटुंब आहे ह्मणून तुमच्या घरीं
आलों, नाहीं तर हमेश बाहेर मैदानांत उतरत असतों
माझें दोनशें स्वारांचें पतक सरकारांत चाकरीस आहे.
मी आतां घरून निघून तिकडेच चाकरीवर जात आहे.
रजा अगदीं भरली. बरें. दिव्यासाठीं एक समाई मि-
ळेल काय! हें ऐकून त्या ब्राह्मणानें समई आणवून
दिल्ही. मग मी गड्याकरवीं तेल आणवून खोलींत दिवा
लावविला आणि घोड्याचा गाशा सोप्यांत खालोंपासून
अगदी लांब एका कोंपऱ्यास आंथरून ठेविला. नंतर
गादी सत्रंजी वगैरे बरोबरचा बिछाना खोलींत घा-

ण्यास सांगितलें. बिछानाघातल्यावर गड्यास सांगितलें कीं, तुह्मांतून एकानें तरी हुशार असावें, आणि मी हाक मारीन तेव्हां आंत यावें.

तिकडे त्या सुंदरीनें घरांत पतीस विचारिलें कीं, घटिकाभर त्या गृहस्थाच्या बायकोपाशीं कांहीं गोष्टी सांगून तिचा समाचार घेऊन येऊं कां? त्यानें जा, पण लौकर ये, असें सांगितलें. [ बायको समक्ष असली ह्मणजे तिच्या पतीविषयीं शंका घेण्यास कांहीं कारण नाहीं. असें त्यास तेव्हां वाटलें असेल. ] मग ती सुंदरी खोलींत आली तेव्हां मीहि वारंवार बाहेर येऊन गड्यास हाक मारून कांहीं काम सांगावें आणि पुन्हा आंत जाऊन दारांतच बसावें. तितक्या वेळेंत, एथ पर्यंत माझें काम मी उपदेशा प्रमाणें केलें ना? कांहीं चूक भूल झाली नाहींना? असा मी प्रश्न केला. तिनें सर्व बरोबर झालें असें सांगून एथून पुढें मी अमुक अमुक करणार आहे असें पूर्वींच आपलें कर्त्तव्य मला सांगितलें होतें, तेंच सर्व कांहीं अधिक उणें सांगून दोन घटिकांनीं ती परत गेली.

पतीचें भोजन, तांबूलभक्षण झाल्यावर तिनें पतीस विचारिलें कीं, आज जवळ मारुतीच्या उत्सवाचें ललित आहे, सोंगाड्ये नवे फार चांगले आले आहेत, तर ती मौज पाहण्यास जाण्याविषयीं मला आज्ञा मिळेल काय? पति ह्मणाला तूं जाशील पण मूल

पिण्यासाठीं उठून रडूं लागलें तर मी काय करावें? तिनें सांगितलें त्या शिलेदाराची बायको फार सज्जन आहे मी गेल्यें तेव्हां उठून दंडवत करून तिनें माझा चांगला आदर केला. वयानें माझ्या एवढीच आहे, आपल्या हातांपायास केशराचें तेल लावित बसून तिनें विचारिलें कीं तुह्मास मुलें बाळें काय आहेत? प्रपंचाची सोय कशी आहे? पतीची प्रीति कशी आहे! माझ्या गोटपाटल्या वगैरे पाहून तिनें त्यावरूनच अनुमान करून सांगितलें कीं, पतीची प्रीति चांगलीच असावी असें वाटतें त्याशिवाय बायकोला इतकें सजवितो कोण? त्यावर मी ह्मटलें हें शेवटीं जें तुह्मीं बोललां हें सत्य आहे, या विषयीं मी जन्मांतरी देव फारच अर्जविला आहे. इतरहि सर्व बायकांच्या जातीला जसें पाहिजे तसें आहे, कमी नाहीं, मग ती ह्मणाली-बाई तर खऱ्या तुह्मीं दैववान्. ( पहा स्त्रियांचे अनृत, साहस माया हे दुर्गुण सांगितलें तें खरें कीं, नाहीं )

**प्रवाल०**— अरे पण तूं यांला दुर्गुण नको ह्मणूं. तुझें जन्माचें सार्थक काय तें यांनींच केलें आहे ना? बरें चल पुढें.

**वसंत०**— अरे बाबा तुझ्याशीं बोलणें ह्मणजे केवळ तरवारीची धार आहे, केसभर अवधान चुकलें कीं, लागलेंच मारल्याखेरीज राहत नाहींस. पण यावरू न एक संतोष मानितों कीं, तूं चित्त ऊदन ऐकत

आहेस खरा. काडीमात्र ढळत नाहींस. ऐका तर पुढील वर्तमान.

पुढे ती सुंदरी पतीस सांगू लागली कीं, मग मी तिला आपल्या मारुतीच्या उत्सवाची सर्व मौज सांगून म्हटलें आज तेथें ललित फार चांगलें आहे पण मी नाईन तर मूल लहान. तेथें न्यावें तर कोणाची दृष्ट लागेल, ठेवून जावें तर रात्री पिण्यासाठीं रडूं लागेल, तर तेंही अवघड, अशा अडचणी मुळें जाणें घडत नाहीं, मौज चांगली आहे म्हणून जिवाला मोठी तळमळ लागली आहे. हें ऐकून ती म्हणाली तर आतां मी सांगत्ये. तुम्हीं मनांत संकोच धरूं नका. मला पहिलेंच मूल झालें होतें तें नुगतेंच मेलें, अद्यापि मला दूध आहे. तुमचें मूल उठून रडूं लागलें तर मजकडे आणून द्यावें असें आपल्या यजमानास सांगून जा, मागली काळजी तिळमात्र करूं नका. माझे यजमान बाहेरच निजत आहेत. मूल मजकडे आणण्याविषयीं मनांत किमपि किंतू आणूं नये. असें सांगून स्वस्थपणें जा. अशी सोय आहे. म्हणून आपण आज्ञा दिली म्हणजे झालें दुसरी कांहीं अडचण नाहीं. हें ऐकून तिच्या पतीनें सांगितलें, असें असेल तर खुशाल जा. मी विनाकारण तुझ्या मनोरथाला कां आड यावें? ( त्याला वाटलें असेल कीं, या कारणानें त्या एवढ्या श्रीमंताच्या स्त्रीशीं हस्तस्पर्शानें तरी माझा संबंध होईल,

या करितां ही घरांत नसेल तर बरेंच. ) पतीची अशी आज्ञा होतांच ती मागील दारानें मारुतीच्या मंडपांत तेथें आपल्या चार मैत्रिणींशी कांहीं संभाषण करून आपल्या पुढील दरवाजानें, मी खोलींत मार्गप्रतीक्षा करित बसलों होतों तेथें आली.

**प्रवाल०** — थांब, थांब वसंतगुच्छा मला कांहीं असंभवाची शंका आली आहे, ह्मणून मी तुझ्या या प्रेमरसाला किंचित् आड येतों, रागाऊं नकोस. हें दोन वेळचें तिचें व पतीचें भाषण, तिचें मारुतीच्या मंडपांत जाणें इत्यादि तुझ्या परोक्ष झालेलें वृत्त सांगतोस, तर ही सर्व काल्पितकादंबरीच आहे कीं काय. पण असें हि ह्मणवत नाहीं, कारण, तुझी ही आतांची मुखचर्या संतोष व प्रेम हीं लक्षणें पाहून तूं हें सर्व अनुभविलें आहेस असें खचित दिसतें. तर काय तुला, खोलींत केवळ बकध्यान धरून बसला होतास तितक्यानेंच अतींद्रिय ज्ञानाची सिद्धि झाली कीं, काय?

**वसंत०** — प्रवलशेखरा तूं भारीरे उतावळा! आतां पुढील संदर्भांत या शंकेचेंच समाधान पहिल्यानें आहे, ऐक· ती दुसऱ्यानें खोलींत आली तेव्हां मी तिला विचारिलें कीं, इतका उशीर कां लागला. बाहणा काय केला आहे! तेव्हां तिनें हें सर्व झालेलें भाषण व वर्त्तणें सांगितलें आहे.

**प्रवाल०**— बरें तर, आतां जुळलें, चालूंदे पुढें.

वसंत•— मग तिनें प्रथम बराचवेळ कांहीं बरस कांहीं उदासपणाचें असें मिश्रित भाषण करून शेवटीं ह्मटलें कीं. सख्या मूल उठलें ह्मणजे तो घेऊन येईल त्यावेळेस तुला चोड येण्यासारिखें मजकडून कांहीं झालें तरी, मनांत राग ठेवूं नको, एवढी माझी हात जोडून प्रार्थना आहे. मीं ह्मटलें, प्रिये तुझ्या प्रीतीच्या खरेपणाविषयीं मला कांहीं तरी संशय आहे काय? नाहीं. म्हणून तूं जें करिशील तें केवळ माझ्या साठींच करशील असें मी खचित समजतों. तूं उगीच असें उपरोधिक कांबरें बोलत्येस! त्या समयीं ती प्राणवल्लभा गळ्यांत हात घालून बसली असतांहि विरहदु:ख अतिनिकट येऊन ठेपल्यामुळें शृंगार रसाचा प्रचार झाला तरी तो, मांजर उंदराला खेळवित असतां त्या उंदराचा जसा संचार होतो तसा होई. त्यासमयीं दोघांचेंहि चित्त वाहुटळींत जसें कसपट तसें झालें होतें. केवळ पुन्हा समागमाच्या आशेमुळें जीवित मात्र राहिलें, अशी ती स्थिति अत्यंत भयंकर झाली. असें असतांहि [ तिचें चातुर्य व धैर्य काय आश्चर्य कारक पहा. ] तिनें गोष्टी सांगतां सांगतां त्या विरहदु:खाचें स्मरण नाहींसेंच केलें, असें कीं, चारघटिका प्रथम समागमकालीं जशा विलासमय गेल्या तशाच तेव्हां गेल्या तेणें करून मनाचें समाधान अतिशय झालें.

पुढें आणखी कांहीं चमत्कारिक विनोदाच्या गोष्टी चालल्या आहेत तों अडीच प्रहर रात्रीच्या सुमारें तिकडे मूल उठल्याची चाऊल झाली, तेव्हां लागलेंच तिनें केशराचें तेल घेऊन हातापायास लावित असतां मला सांगितलें कीं, तूं आतां लौकर बाहेर जाऊन आपल्या गाशावर मोठयानीं घोरत निज, आणि तो मुलास घेऊन परत जाऊं लागला ह्मणजे "बरें बरें कांहां चिंता नाहीं", असें चावळत बोल, मग तो आंत गेला ह्मणजे इकडे ये. हें ऐकून घेऊन मी आपल्या ठिकाणीं जाऊन निजलों; इतक्यांत त्यानें दार उघडिलें. तिनें तें जाणून दिवा मालविला, रात्र निवळली होती म्हणून बरेंच दिसत होतें, मी तिकडे पहातच होतो, मग तो ब्राम्हण क्षणभर माझी चाऊल घेऊन खोलीच्या दाराशीं गेला, तेव्हां तिनें त्याला हातीं धरून आंत ओढून नेलें, मग तेव्हांपासून तो दोन घटिका आंत होता, नंतर मुलाला घेऊन घरांत गेला, आणि त्यानें दार घट्ट बंद केलें. हें सर्व या प्रमाणें झाल्यावर मी उठून खोलींत गेलों. तेव्हां तिनें म्हटलें कीं, तो फार वेळ खोलींत होता त्याचा उपयोग पुढील संकटाच्या परिहाराकरितां होईल, मी तुला मघाशीं प्रार्थना केली ती या साठींच, मगमी विचारिलें कीं, कसें काय झालें? तेव्हां तिनें सर्व सांगितलें. तो दाराशीं येतांच मी मुकाटयानें त्याला ओढून आंत

घेतलें आणि गळ्यांत हात घालून त्याला बसविलें, नंतर त्याचासांगा अपल्या मांडेखालीं दाबून धरून मुळांस घांजिलें, मग त्याच्याशीं संग करून आलिंगनादिकांच्या-योगानें त्याला असें दर्शविलें आहे कीं, आज मी त्या साठीं फारच आतुर झाल्यें होत्यें. तेणेंकरून त्याला वाटलें असावें कीं, आज माझ्यासारिखा धन्य मीच. काय मला अलभ्यलाभ झाला हा! अशी श्रीमंताची उत्तम स्त्री आपण होऊन माझ्या गळां पडली. अशा आनंदसमुद्रांत तो बुडाला आहे. हें मी खचित सांगतें. कारण तो इतका फुगला कीं या दारांतून येतांना सहज आला पण जातांना तो अडकला, त्याला घुसून जोरानें बाहेर निघावें लागलें हें ऐकून मला हसूं आलें, आणि मोठा अचंबा वाटला.

नंतर विनोदाच्या गोष्टींत कांहीं वेळ गेला इतक्यांत बाहेर वाद्यांचा गजर व तोफांचे बार होऊं लागले. तेव्हां ती म्हणाली रात्र थोडी उरली, ललिताच्या आरतीची वेळ जवळ आली तर आतां मी जाऊन हौदावर हातपाय तोंड चकचकीत धुवून आरतीसाठीं देवळांत जात्यें. मग तेथें आरती पाहतांना ओळखीच्या बायकांस आढळून मागील दारानें घरांत येईन. आणि घरांतील कामाच्या मिषानें नवऱ्याकडे नजातां दागिने उकलून काढून पदरांत बांधून ठेवीन. नंतर तूं उजडतांना निघशील तेव्हां मेणा, घोडा, पुढें

चालता करून त्या मागून चाल. इतक्यांत मी पाण्याची घागर घेऊन हंदाजवळ तुला भेटेन आणि आमच्या घरीं पुष्कळ द्रव्य असून माझीं गरीब आईबापें यांस आजपर्यंत माझ्या हातून कांहीं उपयोग झाला नाहीं, तर आतां तुह्मी **चंद्रपुरास** जात आहां वाटेवर **निर्मलींत** जाऊन आयाचितांच्या घराचा शोध करा आणि तेथें जाऊन **दाजीदीक्षित** यांस हे दागिने तुह्मास तुमच्या लेकीनें दिले आहेत असें सांगून द्या. असें सांगून मी दागिने देईन ते कांहीं चरफडलेसें करून घे आणि घोड्यावर बसून चालता हो. तूं गेल्यावर मग इतकें द्रव्य एकदम गेल्यामुळें त्या माझ्या लुब्धक पतीनें अनर्थ काय केला, माझा परिणाम काय झाला, हें नकळतां तुला पुढें जाववणार नाहीं, फारच काळजी लागेल, या करितां उद्यां परत येऊन पहिल्या रीति प्रमाणें मग भेट ह्मणजे मी तुला सर्व हकीकत सांगेन. मग तुला निश्चिंतपणानें जातां येईल. असें पूर्वीं संक्षेपानें सांगितलें होतें तेंच विस्तारानें सांगून ती चालती झाली. मग मीहि आपली तयारी करवून उजाडत आहे तों निघून चालतां झालों; पुढें जातां तों मागून तिनें येऊन सरी गळ्यांत होती तीहि काढून सर्व दागिने हांदावरचे लोक पहात असतां संकेताप्रमाणें बोलून माझ्या पदरांत टाकिले. ते मी चरफडत घेऊन घोड्यावर बसलों आणि **चंद्रपुराकडे** चालता झालों.

नंतर तेथें भाडेकरी यास निरोप देऊन ती लक्ष्मीची मूर्ति एका पुजाऱ्याला दिली. आणि सायंकाळीं पूर्वीच्या गांवीं आलों. मनांत धसधस होती कीं, शेवट काय झाला कोणजाणे. मग दुसऱ्या दिवशीं त्या घरीं गेलों तों दारापुढच्या ओट्यावर प्रतिबंधाचें चिन्ह तें कामरिपूचें लिंग दृष्टीस पडलें. तें पाहून कंबरच बसली अनेक कल्पना उठूं लागल्या. ब्राह्मणानें कांहीं मोठा अनर्थ केला असें वाटलें. मग तसाच दुःखाकुल लटपटित पायांनीं बिऱ्हाडीं आलों. वाटेनें ऐकतों तों कोणी ह्मणतात तिनें हिय्या करून बापाला दिलें तें ठीक केलें, नाहींतर अशा कृपणाचें धन कोठें तरी अनाठायींच जाणार. कोणी ह्मणतो बाप झाला म्हणून काय झालें? नवऱ्याच्या परवागी खेरीज असें करणें तिला उचित नाहीं. कोणी छिद्रान्वेषी म्हणतो, अगोदर बापालाच दिलें कशावरून कोण जाणे काय असेल तें! असें अनेक प्रकारच बोलत. पण परिणाम काय, हें कोणाच्याहि बोलण्यावरून समजलें नाहीं. पुढें दुसरी रात्र पहिली पेक्षांहि दुःखांत घालवून तिसऱ्या दिवशीं गेलों तों ती दारांत वाटच पहात होती. मला पहातांच हंसत हंसत पुढें येऊन म्हणाली कीं, कांहीं चिंता करूं नका. सर्व आग विझाली, स्वस्थ अस. काल थोडा दिलगीर होता म्हणून बाहेर गेला नाहीं, मग रात्रीं अनेक प्रकारांनीं मी सांत्वन केलें तें-

व्हां त्याचें मन शांत झालें असें की, उलटा माझा उपकार मानूं लागला. आतां आज रोजच्या प्रमाणें तो आपल्या उद्योगास गेला आहे.

मग मी म्हटलें आतां माझें मन निःकाळजी झालें उरांतली धडकी नाहींशी झाली मला अवसान आलें. तर कसें कसें झालें विस्तारानें सांग बरें पाहूं! नंतर तिनें सांगण्यास आरंभ केला.

तूं पुढें गेल्यावर मी घागर भरून घरीं आल्यें इतक्यांत पतीचा परमस्नेही **गेंडभट** ( त्याचें शरीर वातूळ आहे, म्हणून रानांतील **गेंडा** म्हणून पशु जसा भरलेला दिसतो तसा तो दिसतो म्हणून त्याला थट्टेनें **गेंडा गेंडा** म्हणूं लागले त्यावरून त्याचें **गेंडभट** असें नांवच पडलें आहे. ) तो त्यावेळेस हौदावर तोंड धुवित होता. तो माझ्या मागोमाग आला, आणि पतीस म्हणाला अरे **सभासली** निजलास काय! ऊठ बायकोनें घर बुडविलें सर्व दागिनें एका शिलेदाराच्या हातीं देऊन माहेरास पोंचवा असें सांगितलें, त्यावरून तो घेऊन गेला हें ऐकतांच मग काय? तो आधींच लुब्धक आणि त्यांतून पांचहजारांचा विषय एकदम गेला. मग त्यानें मला दरडाऊन हाक मारिली, तेव्हां मी भीत भीत जवळ गेल्यें, मला पाहतांच पुष्कळ शिव्यागाळी करून मारायास धावला. तेव्हां मी हात जोडून म्हटलें, माझी गोष्ट ऐकून घ्यावी, आणि मग जर दागिनें

माहेरास यायाचे नाहींत, असें म्हटलें तर मी संध्या-काळाला तुमचे दागिने परत आणून देईन. हें ऐ-कून तो चरफडतच म्हणाला, ( सांग सांग काय सांगतेस तें, ) मग मीं ह्मणाल्यें आपण रात्रीं मूल पाजण्यासाठीं त्या बाईकडे गेलां तेव्हां तेथें काय कर्म केलें! स्मरण आहे काय! त्या शिलेदारानें तुह्माला आणि आपल्या बायकोला लावून कांहीं अवाच्य भाषण केलें. मी पहाटेस लज्जित हून आल्यें तेव्हां मला तुह्मी दाराची कडी काढिली त्यावेळेस एकदम के-शाची भरकी आली त्यावरून माझा निश्चय तर त्या विषयीं झालाच आहे. इतकें ऐकतांच तो पाण्यांत जसें ढेकूळ तसा विराला आणि एँएँ मी काय केलें, मी काय केलें, असें हलक्या स्वरानें बोलूं लागला. तें ऐकतांच मी मनांत म्हटलें बसला माझा अम्मल, गेलें भय झालें काम, माझे चोरास मुद्यावर धरिलें म्हणजे काय-बानें पळायास कितीहि वाटा असल्या तरी त्या त्याला दिसत नाहींत तो लागलाच घाबरतो. तशी त्याची अवस्था झाली. तें पाहून मी बोलल्यें कीं, तो शिलेदार निघाला तेव्हां तुम्हां दोघाविषयीं अवाच्य बोलून "मी या सभासदीला जन्म ठेप देऊन किल्यावर टाकीन तरच शिलेदाराचा बच्चा" असा मोठया आवेशानें तणतणत चालला. तें मी पाण्याला जात असतां ऐ-

किलें, आणि गर्भगळित होऊन त्याला विचारिलें. तेव्हां त्यानें हें तुझें दुष्ट कर्म सांगून म्हटलें मी त्यावेळेस अर्धवट झोंपेंत होतों तरि ( बरें बरें चिंता नाहीं. ) असें जापविलें आहे. असें म्हणून हजारों शिव्या देऊं लागला. ( ही जापविण्याची खूण पटली. त्यानें तर तो अगदींच उतरला. ) मग मी त्याच्या हातापायांपासून हे सर्व दागिने दंडा बदल देणें असें सांगून [ लौकिकांत कसें आगवें! ] म्हणून मोहरच्यानिमित्तानें दिले तरी तो चरफडतच होता पण त्याकडून (आतां मी माफी केली. जा, परत, बाई. ) असें अर्जवून वदविलें. तेव्हां मी परतल्यें.

मग मी त्या गेंडभाजास हाक मारून म्हटलें गेंडभाराजी दरवाजा लावा, नाहींतर फजिती नको तेव्हां तो दरवाजा लावून परत आला. नंतर मी किंचित न्याहाळून पहाण्याची मुद्रा करून पताच्या धोतराचा सोगा धरून त्यास दाखविला. तो काय केशरी तेलाचीं बोटें त्यावर उठलीं आहेत, तीं दाखवून मी त्यास म्हटलें कीं मी त्या बाई जवळ जाऊन बसल्यें तेव्हां ती आपल्या हातांपायांस केशराचें तेल लावित होती. खोलींत घमघमाट सुटला आहे, असें यापाशीं येऊन बोलल्यें होत्यें कीं नाहीं विचारा. मग गचंडी धरून दाखविलें, हें पहा, मानेवर केशराचा पंजा सायमंगीन उठला आहे कीं नाहीं. नंतर म्हणाल्यें पितर बोंबलताव

वर्षांतून श्राद्धपक्षाला देखील केशर घरांत दृष्टीस पडे-ना, पण आज पहा कशी चंगळ झाली आहे ती. माझ्या बाळाला पाहूंद्या आतां, केशर भूषण खरें पण त्या रांडे सवतीच्या हातचें आहे म्हणून मला विषा सारिखें जाळितें. अगोदर तें मला धुवून टाकिलें पाहिजे, असें म्हणून मुलास उचालिलें तों त्यावरहि जागजागीं बोट उठलीं आहेत, तें दाखवून म्हटलें गंडभटजी तुह्मीच विचारा बरें, इतका केशराचा पर्वकाळ कशानें झाला.

मग तो भट म्हणाला कायरे सभासली, बायकोनें तर तुला मुखावर धरिलेंसें दिसतें पण तिनें म्हणूनच हिप्या करून तुला सोडविलें, दुसरीच्यानें असें शहाण पणाचें काम होतेंना. तो मेणा गेला तेव्हां मी पहात होतों, त्याच्या फटींतून किरण आंत शिरले होते त्या वरून मला पका भास झाला कीं आंत कोणी तरुण बायको आहे. ती हिरवीकांच नेसली होती, गौरवर्ण, सुकुमार. मोत्यांचें पेंडें वगैरे दागिने ल्यालेली अशी दिसली. इतक्यांत मी म्हटलें, अहो तिची तारीफ तरी करूं नका. तुह्मीं जों जों तारीफ कराल तोंतों इकडे काय? स्वर्ग दोन बोटें उरला आहे, तो अगदींच प्राप्त होऊन तेथें आपल्या बेचाळीस पितरांलाहि उद्धारून नेतील. पुन्हा ह्मटलें मला पहा चंडाळणीला काल ळळितालां जाण्याची माझ्या कर्मानें कशी बुद्धि

दिली. मला तेथें बायकांनीं विचारलें तुझ्या घरीं आज मेणा घोडा कोठचा आला? मी ह्मटलें कोणी शिलेदार वाटसरू रात्रच्या रात्र राहिला आहे मला काय गाढ-वीला ठाऊक कीं तो मजवरच दरवडा आला. पहा माझी केवढी हानि झाली. हें पुढें देवानें वाढून ठेविलें होतें म्हणूनच काल मला जाण्याची बुद्धि झाली. मी आपलें मूल घेऊन गेल्यें असत्यें तरी बरें होतें. म्हणजे याला त्या सवतीकडे जाण्यास निमित्त झालें नसतें. दुर्दैव विपत्ति देऊं लागलें ह्मणजे तें अशीं सर्व साधनें जुळून आणितें. मला कोठें जाण्यांस कधीं सुखानें आज्ञा मिळत नाहीं, पण काल कशी मोठ्या उल्हासानें दिली. मी मूर्ख मला हा मनांतला मतलब काय ठाऊक? असें बोलून मी फुंदफुंदून रडूं लागल्यें आणि पुन्हा म्हटलें, अजून तरी पहा कांहीं पश्चात्ताप होतो कीं काय! उलटें अधिक उत्साहाचें चिन्ह दिसत आहे मी मोठा पराक्रम केला. तरवार गाजविली. शाबास माझी, असें वाटत असेल, मी तरी दागिन्यासाठीं कां रडावें? द्रव्य कोणती तरवार मारून मिळविलें आहे तें उघडच आहे. असल्याचें आपण पोट बांधून जमविलेलें शांतिपुष्टीचें द्रव्य असेंच अनाठायीं जायाचें आपण अन्याय करून दुसऱ्या एखाद्या गरिबाला दंड करणें, असलें आमच्या घरच्या राज्या-सारिखें राज्य कोठेंहि नसेल. असें नानाप्रकारांनीं

बोलल्यें तेव्हां तो अगदीं वरमला.

मग तो गेंडभट म्हणाला, गड्या, ती स्त्रानें फार चांगली होती काय? तें ऐकून पंत म्हणाला, अंधेरांत कोणाला लेका ठाऊक, चांगली होती कीं, वाईट. तेव्हां त्या भटाला व मला देखीलांहि मोठें अनावर हंसें आलें. मग तो भट म्हणाला अरे लेका; अगदींच फुटलें कीं, तुझें गुण हेंच तें. अगदीं तूं भांबवलास, इतक्यांत मी म्हटलं अंधेर कां असेल! रात्रीं त्यानं समाई मागितली तेव्हां थेरडी समई मालकून दवविली कीं नाहीं, विचारा गेंडभावजी. त्यावर तो म्हणाला आतां काय त्या बेच्याला विचारूं! खातरी झाली. तूं केलेंस तें ठीक केलेंस. वांचवीलेंस बाई नवऱ्याला, त्याने झकम रूनये. तुला दुसरे दागिने त्यापेक्षां अधिक करून द्यावे. असें बोलून शाबास शाबास म्हणत आपल्या मित्राची पाठ थपटून तो भट निघून गेला. पंत तेव्हां पासून दुचित्त दिसत आहे. रात्रीचें स्मरण झालें म्हणजे त्याला सुख होतें आणि दागिन्याचें स्मरण झालें म्हणजे दुःख अशी त्याची अवस्था आहे. मी मग रात्रीं त्याला दैव-योगाची अनेक उदाहरणें दाखवून बोध केला त्यानें तो बराच स्वस्थ झाला. पण आतां मला टचकूं लागला आहे. इतकें हें सर्व ऐकून मला विलक्षण अचंबा झाला. मी म्हटलें काय हा तुझा तर्क आणि काय हें इंद्रजाल. अशींच दास्य करून जन्म खरचिलें तरी या अक्कलेचा

ज्ञानांश देखील घेण्याला मी समर्थ होणार नाहीं, असा माझा निश्चय झाला.

नंतर त्याची घरीं येण्याची वेळ झाली, असें पाहून मी निरोप मागितला तेव्हां तिनें गहिंवरलेल्या गळ्यानें, प्राणवल्लभा तूं पांचव्या महिन्याच्या प्रथम दिवशीं नआलास तर चवथ्या महिन्याच्या शेवटल्या दिवसपर्यंतच माझे जीवित हा निश्चय स्मरणांत असूं दे, असें सांगून गळ्याची शपत घालून निरोप दिला. मग मी शेवटचें आलिंगन करून तिचे डोळे पुसून मोठ्या दुःखानें तेथून निघालों. तेव्हां पासून तूं कधीं भेटशील आणि ही गोष्ट तुला कधीं सांगेन असें मला झालें होतें, ती आज तुझ्या कानीं पडली. आतां सफल झालों, प्रवालशेखरा तुला सांगितलें तेव्हां आज मला तें सुख भोगिलेंसें वाटतें, कां आतां खरेंना; अलभ्य लाभ, जन्माचें सार्थक म्हटलें तें खोटें नाहीं ना?

प्रवाल०– शाबास शाबास वसंतगुच्छ, वाहवा. धन्य तूं, ज्या तुजवर अशा चतुर स्त्रीची इतकी प्रीति झाली. उत्कर्षाच्या अतिशयाला जन्माचें सार्थक या शब्दापेक्षां अधिक चांगला दुसरा शब्दच नाहीं. म्हणून असें ह्मणावें इतकेंच. देव करो आणि तुझी तिची भेट लौकर होवो. तुह्मीं उभयतांनीं निरंतर आनंदाच्या निर्भरांत असावें असें मी देवा जगदीश्वरा पाशीं प्रार्थना करून मागतों.

**वसंत०**— बरें तर आतां. मी आपला वृतांत सांगितला तसा तूंहि आपला सांगशील कीं नाहीं आपल्या अनुभवावरून तुझ्या प्रवासाची हकीकत ऐ-कण्याची मला फार उत्कंठा झाली आहे.

**प्रवाल०**— तुला उत्कंटा झाली असावीच. आणि मीहि सांगणार आहेच. परंतु तुझ्या वृतांताची जात वेगळी आणि माझ्या वेगळी. म्हणून मी, तुला तो रंजक होईल कीं नाहीं अशा शंकेत आहे.

**वसंत०**— अशी शंका होण्याचें काय कारण? रंजक कां होणार नाहीं? कोणतीहि गोष्ट सारासार विचार करून सांगणराच्या मुखानें ऐकिली असतां ती रंजकच होत्ये याला कोठें व्यभिचार आहे कीं काय?

**प्रवाल०**— खरं ह्मणतोस. पण हल्लीं तुझ्या म-नाचा कल जिकडे आहे तिकडे लागू होणाऱ्या माझ्या गोष्टी नाहींत. कारण, मी राजसेवेंत गुंतल्यामुळें असा उंडगेपणानें दहा देश फिरलों नाहीं.

**वसंत०**— बरें बाबा; एकूण मी उंडगा ठरलों! ठरूंद्या माझें उंडगेपण काढण्याचा हेतु मी समजलों. आपलें ब्रह्मचर्य अविच्छिन्न असलें ह्मणजे पुरे, त्या पु-ण्यानें मी तरेन. कारण, मित्रत्व खरें असलें ह्मणजे त्यांचा एकमेकावर दाया बंधूप्रेक्षां अधिक असतो, ह्मणून त्या पुण्यांतून मला विभाग मिळेलच.

**प्रवाल०**— पहावें आतां काय होईल तें. मला

पुण्याचा विभाग द्यावा लागतो, किंवा तें वजा पडून बाकीराहील त्याचा विभाग आपल्या मित्रापासून घ्यावा लागतो.

**वसंत०**— नकोरे नको असा भोळेपणानें बोलून नाणाराला नडवूं नको. अथवा तुझा यांत अपराध नाहीं. दरबारांतील अधिकाराच्या गादीचाच हा गुण आहे. त्या लोकांनीं नेहमीं पदोपदीं दुसऱ्यास नडवून आपणास सत्यवादी असें ठरवित असावें याविषयीं तुला साक्षी दाखावितों पहा.

**शकुंतला** व **दुष्यंतराजा** यांचा गांधर्वविवाहानें जायालापतिभाव झाल्यावर दुष्यंत आपल्या राजधानींत गेला. नंतर कांहीं दिवसांनीं कण्वऋषीनें शिष्य बरोबर देऊन शकुंतलेची त्याजकडे रवानगी केली. तेव्हां शकुंतलेला शाप झाला होता, त्या प्रमाणें राजाला त्या आपल्या विवाहाचे विस्मरण झालें होतें, ह्मणून तो शकुंतला आपली पत्नी, हेंच कबूल करीना, त्यामुळें शकुंतला फार शोक करूं लागली. तेव्हां शिष्य रागावून बोलला कीं, तूं परीक्षा केल्याशिवाय एकांतीं अशा मनुष्याच्या वचनावर विश्वास ठेवून फसली आहेस. आतां उगीच कां रडत्येस? आपल्या अविचाराचें फळ भोग हें ऐकून राजानें त्या शिष्यास म्हटलें कीं, तूं या स्त्रीच्या सांगण्यावर विश्वास ठेवून मला प्रतारक ठरवितोस काय? ( त्यावर शिष्य हंसत हंसत बोलला तें

ऐक. ) तपोवनांत कंदमूल भक्षण करून तपस्या करणारा जन, ज्याला दुसऱ्यास ठकवून आपला मतलब साधिला पाहिजे, असा प्रसंग जन्मापासून आलाच नाहीं. त्या जनाचें वचन अप्रमाण होय, आणि जे दुसऱ्यास ठकविण्याच्या युक्तींत निपुण होणें हीच विद्या असें समजून तिचेंच एकाग्रतेनें निरंतर अध्ययन करितात, ते मोठे सत्यवादी होत. ऐकिलेस प्रवालशेखरा? यावरून कळत नाहीं काय? कीं प्राचीन कालापासून गादीचा गुण असाच आहे. मग तुझा स्वभाव असा झाला यांत आश्चर्य काय?

**प्रवाल०** बरें बावा! ! लागला मला गादीचागुण असेंच कां होईना! ज्याशीं आपली मैत्री निरंतर असावी अशी इछा असेल त्याच्या बायकोशीं त्याच्या परोक्ष भाषण करूंनये त्याच्याशीं धनसंबंध करूंनये, व त्याबरोबर अतिवाद करूंनये असें मला गुरुजींनीं सांगितलें आहे, म्हणून मी आतां आपली जीभ दाबून धरितों.

**वसंत०** ठीक गळ्यांत आलें तेव्हां आतां ही युक्ति काढिली काय? बरें तर. मीहि दगडाचें पेव खणणें पुरे करितों.

**प्रवाल०** चालूंदे, पाहिजे तसें बोल, तुला मुबा आहे. दुसरा कसेंहि बोलो त्यावर कांहीं तरी आपला टिक्का लावावा असा तुझा स्वभाव मला पक्का माहित आहे.

**वसंत०** टिक्का लावावा ह्मणजे? खोटें आहे काय?

[ इतकें हंसत हंसत बोलून त्याच्या गळ्यांत हात घालून ह्मणतो. ] सांग तर लौकर, तुझ्या गोष्टीचीं जात वेगळी कशी ती.

प्रवाल.— सांगतों बाबा सांगतों· तो राजा खरा नीतिपंडित ह्मणजे [ यःक्रियावान्सपंडितः ] असा आहे. कामंदकादिनीति ग्रंथांत, राजा, प्रधान, ते ते अधिकारी सभासद, यांचे जेजे सद्गुण सांगितले आहेत तेते प्रायशः त्या दरबारांत आहेत. असे दुसऱ्या कोठेंहि नसतील त्या गुणांच्या योगानें आन्विक्षिकी आणि दंड नीति ह्मणोन जे प्रजा पालनाचे मुख्य मार्ग सांगितले आहेत ते तेथें फार चतुरतेनें व सचोटीनें चालतात ह्मणून तेथील प्रजांत कोणी दीन दुःखित असा आढळत नाहीं, सर्व लोक त्दृष्ट पुष्ट आहेत.

ग्रंथज्ञान उत्तम असलें तरी तदनुसार क्रियांची प्रत्यक्षता झाल्यावांचून तें कार्यक्षम होत नाहीं. आजन्म ब्रह्मचाऱ्यानें शृंगार रसाचें वर्णन केलें तर तें जसें संदिग्ध ह्मणून नीरस असतें तसें केवळ ग्रंथज्ञान लटपटीत असतें असें आहे. ह्मणून तेथें नीति शास्त्राप्रमाणें वर्त्तणूक प्रत्यक्ष अनुभविल्यानें मला पुष्कळ लाभ झाला. पहा आतां, माझ्या गोष्टींत कोणते विषय येतील तें, या जातीचे विषय जर तुला प्रिय असतील तर सांग. ह्मणजे स्मरेल तितकें सविस्तर सांगेन.

वसंत. — अरे प्रिय ह्मणजे ! काय सांगावें !

यांत तर मोठे प्रौढ विषय येणार आहेत मग सविस्तर ऐकण्याची उत्कंठा कशी बरें नसेल! सर्व तुझ्या गोष्टी अवश्य ऐकिल्याच पाहिजेत. त्या योगानें, तुला जो लाभ झाला आहे तो मला कांहीं तरी होण्याचा संभव आहे.

**प्रवाल**०—बरें तर, आतां सांगणें आहे; पण गड्या सूर्यास्तसमय जवळ आला. या झाडांच्या शिखरांकडे पहा. त्यांच्या तवऱ्यांचे प्रमाण अधिक उणें एकमेकीहून अगदीं भिन्न आहे ह्मणून सूर्याचें तेज प्रथम अगदीं नीच तवऱ्यांवरून मग त्यापेक्षां उंचांवरून मग त्यापेक्षां उंचांवरून अशा क्रमानें कसें नाहींसें होऊं लागलें आहे. तें चहूंकडे दृष्टि देऊन पहा. मला वाटतें कीं, सूर्य अस्तास जातांना आपले किरण वेचून घेत आहे. तसेंच मघाशीं पाहिलें, तों चंद्र नुकता क्षितिजावर मात्र आला होता, तेव्हां तो कोळिष्टकाच्या वर्तुलासारिखा दिसत होता, तो आतां पहिल्यापेक्षां कितीवर आला व कांहीं ठळक दिसूं लागला आहे. म्हणून उद्यां अशी रमणीय जागा जेथें अढळेल, तेथें स्नानसंध्या भोजन करून आज उपक्रम केला आहे तो पुढें चालवूं.

**वसंत**०— बरें तर आतां अवकाश नाहीं खरा. उठ तर लौकर, रात्रीं रहाण्यासाठीं गांवांत आपल्या मर्जीप्रमाणें जागा कोठें मिळेल ती पाहूं. मग रात्रीं

कांहीं गोष्टीं सांगशील तर ऐकेन. पण आतां मी तसें ह्मणत नाहीं. कारण, आपल्यास एका जागेवर फारवेळ बोलत बसल्यानें श्रम झाले आहेत.

प्रवाल०—मला श्रमांचें भय फारसें वाटत नाहीं. पण आतां चंद्राची प्रभा झळकली ह्मणजे प्रियेचें स्मरण होऊन तुझी काय अवस्था होईल कोण जाणें! याचीच कायती चिंता आहे

वसंत० पुरे आतां तूं त्या विरहशल्याला भक्का लावून चाळवूं नको. चल लौकर.

असे त्यांचे दोनप्रहर या गोष्टींत सुखानें क्षणासारिखे गेले. मग ते दोघेहि जवळच एक गांव होता तेथें रहाण्याचा विचार करून चालते झाले.

समाप्त.



## शुद्धिपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १ | १५ | चिम्रध्वज. | चित्रध्वज. |
| ४ | १८ | ठाकिच. | ठीकच. |
| १० | ७ | अडकीवलेले. | अडकविले. |
| १२ | ७ | मध्यें. | मध्यें मध्यें |
| १३ | ३ | महानंदांत. | महाभुजंग आनंदांत. |
| १७ | २ | चढला. | चढलों. |
| २५ | १९ | कोठच. | कोटच. |
| २६ | ७ | खुपतो. | दुखतो. |
| २७ | २ | अस. | असा. |
| २८ | ११ | कडचणींत | अडचणींत. |
| ३२ | ८ | चांडळ. | चांडाळ. |
| ४४ | १६ | तोवर. | तीवर. |
| ४७ | २३ | घोलण्या. | घोलप्या. |
| ५० | १८ | अडचणीम्तव. | अडचणीस्तव. |
| ५२ | ६ | व्यामय. | व्यायाम. |
| ,, | १६ | वेशानें | वेषानें |
| ५३ | २ | मलमलली. | मलमली. |
| ५४ | ४ | बिसनी घरीं. | बिसनी त्या घरीं. |
| ५७ | ११ | दृष्टि गेली. | दृष्टि तिकडे गेली. |
| ६० | १६ | गुंतलों. | गेलों. |
| ६९ | १४ | अअनुभवाची. | अनुभवाची. |
| ,, | १७ | सीतकारादिकांची. | सीत्कारादिकांची. |
| ८५ | २१ | कवळ. | केवळ. |
| ९४ | १५ | काम, माझें | काम माझें; |